दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

## सुविचार

जीवन म्हणजे केवळ जगणं नाही, तर प्रत्येक अपयशातून शिकत पुढे जाणं आहे; संयम, प्रामाणिकपणा आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास कठीण काळही मार्ग दाखवतो.

## आप नेत्याची हत्या

**अमृतसर :** आम आदमी पक्षाचे नेते आणि सरपंच झर्मल सिंग यांची येथील एका लग्नाच्या ठिकाणी अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या घालून हत्या केल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तरन तारन जिल्ह्यातील वलथोआ गावातील रहिवासी असलेले सिंह अमृतसरमध्ये एका लग्न समारंभात सहभागी झाले होते तेव्हा काही अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर अगदी जवळून गोळ्या झाडल्या.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. ५ जानेवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १०३ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### हत्तींनी पायदळी तुडवल्याने मृत्यू

**चायबासा :** झारखंडमध्ये वेगवेगळ्या घटनांमध्ये जंगली हत्तींनी दोन जणांना पायदळी तुडवून ठार मारल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. मृतांची ओळख पटली आहे ती पश्चिम सिंहभूम जिल्ह्यातील कितापी गावातील चंपा कुई (४७) आणि लातेहार जिल्ह्यातील मतनाग गावातील वीरेंद्र कोरवा अशी आहे, असे वन अधिकाऱ्यांनी सांगितले. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, चंपा घराबाहेर पडली होती, तेव्हा कळपातून निघालेला एक हत्ती गावात घुसला आणि पहाटे ४.३० च्या सुमारास त्याने तिला तुडवले.

### जगातील सर्वात मोठा तांदूळ उत्पादक देश

**नवी दिल्ली :** भारत १५०.१८ दशलक्ष टन एकूण उत्पादनासह चीनला मागे टाकत जगातील सर्वात मोठा तांदूळ उत्पादक देश बनला आहे, असे केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले, त्यांनी २५ पिकांच्या १८४ नवीन जातींचे उत्पादन केले. या नवीन उच्च उत्पादन देणाऱ्या बियाण्यांच्या जातींमुळे पीक उत्पादन वाढेल आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल, असे त्यांनी सांगितले. या नवीन जाती शेतकऱ्यांपर्यंत लवकर पोहोचतील याची खात्री करण्याचे निर्देश मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांना दिले.

### मोदी या महिन्यात आसाममध्ये?

**गुवाहाटी :** आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी रविवारी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा या महिन्याच्या अखेरीस राज्याला भेट देण्याची शक्यता आहे. पंतप्रधान १७-१८ जानेवारी रोजी येऊ शकतात. केंद्रीय गृहमंत्र्यांना २९ जानेवारी रोजी आमंत्रित करण्यात आले आहे. दोन्ही आमंत्रणे प्राथमिक टप्प्यात आहेत, असे त्यांनी सांगितले.

## जनतेच्या न्यायालयात विजय झाल्याचा केला दावा

# विजयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ठाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चंद्रपूर : महाराष्ट्र महानगरपालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत महायुतीने मिळवलेल्या बिनविरोध विजयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना थेट प्रत्युत्तर दिले. विरोधकांनी खुशाल न्यायालयात जावे, मात्र जनतेच्या न्यायालयात आमचा विजय झाला आहे आणि कोर्टातही जनतेचाच कौल जिंकेल, असा ठाम विश्वास त्यांनी रविवारी येथे व्यक्त केला.**



येत्या १५ जानेवारीला राज्यातील महानगरपालिकांसाठी मतदान होणार आहे. मात्र, त्यापूर्वीच भाजप आणि महायुतीच्या मित्रपक्षांनी ६८ जागांवर बिनविरोध विजय मिळवत विरोधकांवर मोठी आघाडी घेतली आहे. यावरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर धाकदपटशहा आणि पैशांचा वापर केल्याचा आरोप केला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) या बिनविरोध निवडीला न्यायालयात आव्हान देण्याचे संकेत दिले आहेत.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात २९ महानगरपालिकांमध्ये निवडणुका चालल्या आहेत. महाराष्ट्र हा देशामध्ये २ क्रमांकाचं नागरिकरण झालेले राज्य आहे. महाराष्ट्रात एकूण जी लोकसंख्या आहे, त्या लोकसंख्येच्या ५० टक्के लोके ही शहरांमध्ये राहतात. जवळ जवळ ६ कोटी लोक हे महाराष्ट्रातल्या ४० हजार गावांमध्ये राहतात आणि तेव्हढीच ६ कोटी लोक ही महाराष्ट्रातल्या छोट्या शहरांमध्ये राहतात. हा जो काही नागरी भाग आहे, त्यातही जवळपास साडेचार-पाच कोटी लोक हे २९ शहरांमध्ये राहतात. ही महानगरपालिकेची निवडणूक जवळपास ४०-४५ टक्के लोकांच्या जीवनावर परिणाम करणारी अशी निवडणूक आहे, असेही त्यांनी त्यापूर्वी अकोला येथे म्हटले होते.

चंद्रपूर येथील रोडशो दरम्यान पत्रकारांशी संवाद साधताना फडणवीस म्हणाले की, अनेक अपक्ष आणि मुस्लिम उमेदवारही बिनविरोध निवडून आले आहेत, मग त्याबद्दल विरोधक मौन का बाळगून आहेत? स्वतःचा पराभव समोर दिसत असल्याने विरोधक आतापासूनच सबबी शोधू लागले आहेत. चंद्रपूरचा विकास फक्त भाजप-शिवसेनेनेच केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शहरांच्या विकासासाठी ५० हजार कोटी रुपये मंजूर केले आहेत. चंद्रपूरच्या विकासासाठीही निधी उपलब्ध करून दिला जाईल. मात्र, हे पैसे योग्य रीतीने वापरायचे असतील तर भ्रष्ट लोकांना महानगरपालिकेत निवडून देऊ नका, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

## मावळमधील सोएक्स इंडिया कंपनीवर छापा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील टाकवे येथील 'मे. सोएक्स इंडिया प्रा. ली.' या कंपनीवर छापा टाकून अन्न व औषध प्रशासनाने तब्बल ३१ कोटी ६७ लाख २१ हजार ९८७ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी कंपनीचे संचालक आणि व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती अस्मिता टोणपे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ही कारवाई २ जानेवारी रोजी करण्यात आली. यापूर्वी १ डिसेंबर रोजी या कंपनीच्या उत्पादनांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले होते. मुंबईतील अन्न विश्लेषकांच्या अहवालानुसार, या नमुन्यांमध्ये 'निकोटिन' पॉझिटिव्ह आढळले. हे उत्पादन मानवी आरोग्यास घातक असून महाराष्ट्र सरकारने १६ जुलै रोजी काढलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणारे असल्याचे स्पष्ट झाले. एकूण किंमत ३१ कोटी ६७ लाख, २१ हजार ९८७ रुपये (३१.६७ कोटी) रुपयांचे विविध फ्लेवर्सचे तयार हुक्का प्रॉडक्ट्स, कच्चे पदार्थ आणि फ्लेवर्सचा साठा जप्त करून कंपनीच्या दारांना सील ठोकले आहे.

अनिल कुमार चौहान (असिस्टंट मॅनेजर), असिफ फाजलानी (संचालक), फैजल फाजलानी (संचालक), मे. सोएक्स इंडिया प्रा. ली. (कंपनी) या व्यक्तींविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

## भारत २०३६ च्या ऑलिंपिक स्पर्धेच्या तयारीत : मोदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वाराणसी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी सांगितले की, भारत २०३६ च्या ऑलिंपिक स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी पूर्ण ताकदीने तयारी करत आहे.

येथे आयोजित ७२ व्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेच्या उद्‌घाटन समारंभाला व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संबोधित करताना मोदी म्हणाले, गेल्या दशकात विविध शहरांमध्ये २० हून अधिक प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत, ज्यात १७ वर्षांखालील फिफा विश्वचषक, हॉकी विश्वचषक आणि प्रमुख बुद्धिबळ स्पर्धांचा समावेश आहे. २०३० ची राष्ट्रकुल स्पर्धा भारतात होणार आहे. २०३६ च्या ऑलिंपिकचे आयोजन करण्यासाठी भारत पूर्ण ताकदीने तयारी करत आहे, असे मोदी यांनी सांगितले. ४ ते ११ जानेवारी दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत देशभरातील ५८ संघांचे प्रतिनिधित्व करणारे १,००० हून अधिक खेळाडू सहभागी होतील.

या स्पर्धेतून भारतीय व्हॉलीबॉलमधील स्पर्धा, खिलाडूवृत्ती आणि प्रतिभेचे उच्च दर्जा प्रदर्शित होण्याची अपेक्षा आहे, असे एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. वाराणसीमध्ये राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन केल्याने शहरातील क्रीडा पायाभूत सुविधा मजबूत करण्यावर आणि क्रीडा विकासाला चालना देण्यावर वाढता भर अधोरेखित होतो, असे त्यात म्हटले आहे. महत्त्वाच्या राष्ट्रीय कार्यक्रमांचे केंद्र म्हणून ही घटना शहराचे महत्त्व वाढवते, असेही यात म्हटले आहे.

## उद्धव ठाकरे यांच्यासह राज ठाकरे यांचा संयुक्त जाहीरनामा

# ठाकरे बंधूंचा मुंबईसाठीचा वचननामा प्रसिद्ध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधुंनी आज आपला वचननामा प्रसिद्ध केला. मनसे अध्यक्ष राज ठाकरे, उद्धव ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत मनसे, ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गट अशा तिन्ही पक्षांचा संयुक्त जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यामध्ये ठाकरे बंधुंनी मुंबईकरांसाठी वंदनीय बाळासाहेब ठाकरे स्वयं-रोजगार अर्थसाह्य योजना, खिशाला परवडणारा बेस्ट प्रवास, १० रुपयांत नाष्टा अशा नाविण्यपूर्ण योजनांचे आश्वासन दिले आहे.



महापालिकेच्या मालकीच्या जमिनी खासगी विकासकांच्या घशात न घालता तिथे मुंबईकरांची सेवा करणाऱ्या शासकीय, महापालिका, बेस्ट आणि पोलीस कर्मचाऱ्यांना तसंच गिरणी कामगारांना हक्काची घरे देणार. कष्टकरी मुंबईकरांसाठी फक्त १० रुपयांत नाश्ता आणि दुपारचं जेवण देणारी माँसाहेब किचन्स सुरू करणार. पुढील ५ वर्षांत १ लाख मुंबईकरांना परवडणारी हक्काची घरं दिली जातील. घरकाम करणाऱ्या महिलांची नोंदणी करणार आणि नोंदणीकृत महिलांना दर महिन्याला रू.१,५०० स्वाभिमान निधी देणार अशा अनेक योजनांचा यात समावेश आहे.

दरम्यान, पालिका निवडणुकीच्या आनुषंगाने ठाकरे बंधूंनी जो संयुक्त वचननामा प्रसिद्ध केला, त्यात ७०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांना मालमत्ता करमाफी देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. भाजपचे मंत्री आशीष शेलार यांनी त्यावर आक्षेप घेतला असून, मुंबईतील घरांना मालमत्ता करमाफी देण्याचा मुद्दा भाजपचा आहे. हा मुद्दा आता उबाठा आणि मनसेने चोरल्याचा आरोप करत, या वचननाम्याला त्यांनी 'अपचननामा' असे नाव दिले. आमच्या जुन्या मागण्या चोरून वचननामा काढलात, तर तो वचननामा नव्हे, तर चोरलेल्या मागणीचा 'अपचननामा' होईल, असा टोला आशीष शेलार यांनी लगावला.

यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने देशातील सर्वात मोठे ग्रंथालय उभारण्याची घोषणा करण्यात आली आहे. या घोषणेमुळे राजकीय चर्चांना उधाण आले असून, "ठाकरेंना आंबेडकर आताच का आठवले?" असा सवाल विरोधकांकडून उपस्थित केला जात आहे.

वचननाम्यात शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक सुविधा, रोजगार आणि सामाजिक न्याय या मुद्द्यांवर भर देण्यात आला असला, तरी आंबेडकरांच्या नावाने ग्रंथालय उभारण्याची घोषणा ही दलित-बहुजन मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न असल्याची टीका केली जात आहे. विशेषतः मुंबईतील अनुसूचित जाती-जमाती आणि अल्पसंख्याक मतदार निर्णायक ठरण्याची शक्यता लक्षात घेता, ही घोषणा केवळ विकासात्मक नसून राजकीय समिकरणांचा भाग असल्याचे बोलले जात आहे.

## चीनचे अमेरिकेला तोडगा काढण्याचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** चीनने अमेरिकेला व्हेनेझुएलाचे पदच्युत अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीची तात्काळ सुटका करण्याचे आणि संवाद आणि वाटाघाटीद्वारे समस्या सोडवण्याचे आवाहन केले. अमेरिकेने पदच्युत अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला जबरदस्तीने ताब्यात घेतल्याबद्दल आणि हद्दपार केल्याबद्दल चीन तीव्र चिंता व्यक्त करतो, असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने येथे जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.




अमेरिकेला कडक इशारा देताना, चीनने म्हटले आहे की हे पाऊल आंतरराष्ट्रीय कायद्याचे, आंतरराष्ट्रीय संबंधांच्या मूलभूत नियमांचे आणि संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरच्या उद्देशांचे आणि तत्त्वांचे स्पष्ट उल्लंघन आहे. चीन अमेरिकेला पदच्युत राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीची वैयक्तिक सुरक्षा सुनिश्चित करण्याचे, त्यांची त्वरित सुटका करण्याचे, व्हेनेझुएलाचे सरकार उलथवून टाकण्याचे प्रयत्न थांबवण्याचे आणि संवाद आणि वाटाघाटीद्वारे समस्या सोडवण्याचे आवाहन करतो, असे निवेदनात म्हटले आहे.

शनिवारी, मंत्रालयाने व्हेनेझुएलावरील अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांचा आणि मादुरो आणि त्यांच्या पत्नीच्या अटकेचा निषेध केला आणि ते आंतरराष्ट्रीय कायद्याचे गंभीर उल्लंघन करणारे वर्चस्ववादी कृत्य असल्याचे म्हटले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हेनेझुएलावरील अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांची घोषणा आणि मादुरो आणि त्यांच्या पत्नी सिलिया फ्लोरेस यांच्या अटकेबद्दल विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना, चीनने म्हटले की ते एका सार्वभौम राष्ट्राविरुद्ध अमेरिकेच्या निर्लज्ज बळाचा वापर आणि त्यांच्या अध्यक्षांविरुद्धच्या कारवाईचा तीव्र निषेध करत आहेत.

अमेरिकेच्या अशा वर्चस्ववादी कृत्यांमुळे आंतरराष्ट्रीय कायदा आणि व्हेनेझुएलाच्या सार्वभौमत्वाचे गंभीर उल्लंघन होते आणि लॅटिन अमेरिकन आणि कॅरिबियन प्रदेशातील शांतता आणि सुरक्षिततेला धोका निर्माण होतो, असे मंत्रालयाने म्हटले आहे. चीन याचा तीव्र विरोध करतो.

आम्ही अमेरिकेला आंतरराष्ट्रीय कायदा आणि संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरच्या उद्दिष्टांचे आणि तत्त्वांचे पालन करण्याचे आणि इतर देशांच्या सार्वभौमत्वाचे आणि सुरक्षिततेचे उल्लंघन करणे थांबवण्याचे आवाहन करतो, असे त्यात म्हटले आहे.

## चौकशी अहवाल येईपर्यंत विजयी नाही

# बिनविरोध उमेदवारांचे निकाल आयोगाने रोखले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** चौकशी अहवाल येईपर्यंत बिनविरोध उमेदवारांना विजयी जाहीर करू नका, असे आदेश राज्य निवडणूक आयोगाने महापालिका आयुक्तांना दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे आता बिनविरोध उमेदवारांवर टांगती तलवार आहे.

राज्यातील २९ महापालिकांसाठी निवडणूक रंगली आहे. प्रचाराचा धुरळा उडाला आहे. अर्ज माघारी घेण्याच्या अखेरच्या दिवशी राज्यात ६९ उमेदवार बिनविरोध निवडून आले. यामध्ये सत्ताधारी भाजपचे ४४, शिंदेंच्या शिवसेनेचे २२ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे २ उमेदवार बिनविरोध निवडून आले.




एकाचवेळी इतके बिनविरोध उमेदवार निवडून आल्यानंतर विरोधकांकडून आरोपांचा सपाटा लावला. पाच ते १० कोटी रुपये अर्ज माघारी घेण्यासाठी दिल्याचा आरोप करण्यात आला. त्यानंतर आयोगाकडून यावर दखल घेण्यात आली.एखाद्या प्रभागातील निवडणूक बिनविरोध पार पडल्यास राज्य निवडणूक आयोगाला सविस्तर अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा आणि आयोगाच्या मान्यतेनंतरच निकाल जाहीर करण्यात यावा, असे आदेश देण्यात आले आहेत.

## भारतीय लष्कराला पुण्याच्या कार्बाइनचे बळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** स्वदेशी बनावटीच्या क्लोज क्वार्टर बॅटल (सीक्यूबी) कार्बाइन या बंदुकींचा पुरवठा पुण्यातील भारत फोर्ज कंपनीकडून भारतीय लष्कराला केला जाणार आहे. याबाबत भारत फोर्जने नुकताच संरक्षण मंत्रालयाशी १ हजार ६६१ कोटी रुपयांचा करार केला. कंपनीकडून पुढील चार वर्षांत २ लाख ५५ हजार बंदुकींचा पुरवठा भारतीय लष्कराला केला जाणार आहे.

सीक्यूबी कार्बाइन ही ५.५६ मिमी x ४५ मिमी या प्रकारची आहे. तिची रचना, बनावट आणि निर्मिती भारतीय आहे. शस्त्रास्त्र संरक्षण व विकास संस्था (एआरडीओ), संरक्षण संशोधन व विकास संस्था (डीआरडीओ) आणि भारत फोर्जने संयुक्तपणे ही कार्बाइन विकसित केली आहे. आत्मनिर्भर भारत मोहिमेअंतर्गत भारत फोर्ज कंपनीकडून कल्याणी स्ट्रॅटेजिक सिस्टीम्स या उपकंपनीच्या माध्यमातून संरक्षण उत्पादन




केले जात आहे. संरक्षण दलांना अत्याधुनिक संरक्षण उत्पादने पुरविण्याचे काम कंपनीच्या माध्यमातून केले जात आहे. कंपनीला गेल्या पाच वर्षांत लष्कराकडून हा चौथा कार्यादेश मिळाला आहे, असे भारत फोर्ज कंपनीने म्हटले आहे.

संरक्षण दलांना अत्याधुनिक शस्त्रास्त्रे देण्याचे पाऊल उचलण्यात आले असून, सीक्यूबी कार्बाइन त्याचाच भाग आहेत. या कार्बाइन अचूक, जलदपणे काम करतात. सरकारकडून खासगी क्षेत्रातील संरक्षण उत्पादनाला प्रोत्साहन देऊन मेक इन इंडिया मोहिमेला गती दिली जात आहे.

या माध्यमातून अर्थव्यवस्थेला गती मिळण्यासोबत रोजगारात आणखी वाढ होणार आहे. याचबरोबर स्वदेशी बनावटीच्या संरक्षण उत्पादनांच्या निर्मितीला बळ मिळणार आहे. तसेच, या क्षेत्रातील निर्मिती आणि कच्च्या मालाचा पुरवठा करणाऱ्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना पाठबळ मिळेल, असे संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे.

शहरी भागातील मोहिमांसाठी सीक्यूबी कार्बाइनची रचना करण्यात आली आहे. दहशतवादविरोधी कारवाया, लोकसंख्येची जास्त घनता असलेल्या भागातील कारवायांमध्ये वापर करण्यास ती योग्य आहे. ही कार्बाइन इतर बंदुकींपेक्षा छोट्या आकाराची आणि कमी वजनाची आहे. त्यामुळे गर्दीच्या ठिकाणीही कारवाई करण्यासाठी ती अधिक योग्य ठरते. या कार्बाइनची चाचणी आंतरराष्ट्रीय मानकांनुसार घेण्यात आली आहे. तिचे वजन ३.३ किलो असून, तिचा पल्ला २०० मीटर आहे. त्यामुळे तिची जलद हाताळणी करणे शक्य होते.

## अमेरिकेने तेलसाठ्यांवर नियंत्रण मिळवले तर तेल कंपन्यांचा लाभ होणार

# व्हेनेझुएलातील परिस्थितीचा भारताला फायदा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिकेने काल रात्री उशिरा व्हेनेझुएलावर हल्ला केला आणि त्यांचे अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला अटक केली. दोघांनाही अमेरिकेत आणण्यात आले आहे आणि तिथे त्यांच्यावर खटला चालवला जाईल. सध्या अमेरिका व्हेनेझुएलावर राज्य करत राहील. या अमेरिकेच्या हल्ल्याचे कारण व्हेनेझुएलाच्या तेल साठ्यांना असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या तेल क्षेत्रांवर नियंत्रण मिळवले तर भारताला त्याचा फायदा होऊ शकतो आणि आर्थिक फायदा मिळू शकतो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.



तज्ज्ञांनी सांगितले की या विकासामुळे भारताचे सुमारे १ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे दीर्घकाळ प्रलंबित असलेले थकबाकी वसूल होऊ शकते आणि निर्बंधांनी ग्रस्त व्हेनेझुएलातील भारतीय संस्थांद्वारे चालवल्या जाणाऱ्या तेल क्षेत्रांमधून कच्च्या तेलाचे उत्पादन वाढू शकते. हे लक्षात घेण्यासारखे आहे की भारत एकेकाळी व्हेनेझुएलाच्या जड कच्च्या तेलाचा मोठा आयातदार होता, त्याच्या शिखरावर दररोज ४,००,००० बॅरलपेक्षा जास्त आयात करत होता. तथापि, २०२० मध्ये अमेरिकेच्या निर्बंधांमुळे आणि अनुपालन जोखमींमुळे ही आयात विस्कळीत झाली.

भारतातील आघाडीची परदेशी तेल उत्खनन आणि उत्पादन कंपनी ओएनजीसी विदेश लिमिटेड (ओव्हीएल) पूर्व व्हेनेझुएलातील सॅन क्रिस्टोबल तेल क्षेत्र संयुक्तपणे चालवते. अमेरिकेच्या निर्बंधांमुळे आवश्यक तंत्रज्ञान, उपकरणे आणि सेवांमध्ये प्रवेश रोखला गेला आहे, ज्यामुळे उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला आहे आणि व्यावसायिकदृष्ट्या व्यवहार्य साठ्यांमध्ये जवळजवळ अडथळा निर्माण झाला आहे. व्हेनेझुएलाच्या सरकारने प्रकल्पातील ओव्हीएलच्या ४० टक्के हिस्स्यावर २०१४ पर्यंत देय असलेले ५३६ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सचे लाभांश अद्याप दिलेले नाहीत. पुढील कालावधीसाठीही अशीच रक्कम देय आहे, परंतु ऑडिट मंजुरीअभावी या दाव्यांचे निपटारा प्रलंबित आहे.

विश्लेषकांच्या मते, जर अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या तेल साठ्यावर ताबा मिळवला तर निर्बंध शिथिल होऊ शकतात. त्यानंतर ओव्हीएल गुजरात आणि इतर भागातून रिग आणि इतर उपकरणे पाठवून उत्पादन वाढवू शकते. सध्या, उत्पादन दररोज फक्त ५,००० ते १०,००० बॅरलपर्यंत कमी झाले आहे. अधिकाऱ्यांचा अंदाज आहे की प्रगत उपकरणे आणि अतिरिक्त विहिरींच्या वापरामुळे उत्पादन दररोज ८०,००० ते १००,००० बॅरलपर्यंत वाढू शकते. ओएनजीसीकडे यासाठी आवश्यक रिग आधीच आहेत. अमेरिकेच्या नियंत्रणाचा अर्थ असा आहे की जागतिक बाजारपेठेत व्हेनेझुएलाची निर्यात लवकरच पुन्हा सुरू होऊ शकते, ज्यामुळे ओव्हीएलला त्याचे जुने थकबाकी वसूल करण्यास मदत होईल.

ओव्हीएलने यापूर्वी शेवरॉनला दिलेल्या विशेष परवान्याप्रमाणेच अमेरिकेच्या ट्रेझरी डिपार्टमेंटच्या ऑफिस ऑफ फॉरेन अॅसेट्स कंट्रोल (ओएफएसी) कडून निर्बंध सवलतीची मागणी केली होती. केप्लरचे वरिष्ठ संशोधन विश्लेषक निखिल दुबे म्हणाले की, निर्बंध शिथिल केल्याने व्यापार प्रवाह लवकर पूर्ववत होऊ शकेल आणि व्हेनेझुएलाचे कच्चे तेल भारतीय रिफायनरीजपर्यंत पोहोचू शकेल. रिलायन्स इंडस्ट्रीज, नायरा एनर्जी, इंडियन ऑइल आणि एचपीसीएल-मित्तल एनर्जी सारख्या भारतीय रिफायनरीजमध्ये जड क्रूडवर प्रक्रिया करण्याची प्रगत क्षमता आहे. विश्लेषकांच्या मते, व्हेनेझुएलाच्या तेलाच्या परतफेडीमुळे जागतिक बाजारपेठेत किमती स्थिर होतील आणि भारतासारख्या आयातदार देशांना धोरणात्मक फायदे मिळतील.

## धर्म आणि संस्कृती केवळ मातृशक्तीमुळेच सुरक्षित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भोपाळ :** आपण ज्यावेळी सुसंस्कृत समाजाबद्दल बोलतो तेव्हा, महिलांची भूमिका आपोआपच केंद्रस्थानी असते. आपला धर्म, आपली संस्कृती आणि आपली सामाजिक व्यवस्था केवळ महिलांमुळेच सुरक्षित आहे, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केले. ते भोपाळ येथे 'मातृशक्ती संवाद' या कार्यक्रमात बोलत होते.

डॉ. भागवत म्हणाले की, लव्ह जिहाद रोखण्यासाठी प्रथम आपल्या स्वतःच्या घरातून आणि कुटुंबातून प्रयत्न सुरू झाले पाहिजेत. आपण आपल्या मुलीला एखाद्या अनोळखी व्यक्तीकडून कसे फसवले जाऊ शकते याचा विचार केला पाहिजे. याचे मुख्य कारण म्हणजे कुटुंबातील परस्पर संवादाचा अभाव असल्याचे त्यांनी सांगितले. पाश्चात्य समाजात लग्नानंतर स्त्रीचा दर्जा निश्चित केला जातो, परंतु भारतीय परंपरेत, मातृत्वाद्वारे स्त्रीचा दर्जा उंचावला जातो. मातृत्व हे आपल्या भारतीय मूल्यांच्या गाभ्यामध्येच आहे. आज आधुनिकतेच्या नावाखाली लादले जाणारे पाश्चात्यकरण ही एक अंध शर्यत आहे. आपण मुलांना कोणती मूल्य शिकवतो याचा गांभीर्याने विचार करणे महत्त्वाचे आहे. कुटुंबात महिला महत्त्वाची भूमिका बजावतात. महिला नेहमीच कुटुंबाचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी घेत आल्या आहेत. कुटुंबात संतुलन, करुणा आणि सुव्यवस्था राखणे हे प्रामुख्याने महिलांवर अवलंबून आहे, असेही ते म्हणाले.

## संपादकीय

# ठाकरेंचे पुतना मावशीचे प्रेम

**निवडणुका जवळ आल्या की, ठाकरेंना एकाएकी मराठी माणसाबद्दल ममत्व दाटून येते. प्रत्यक्षात मुंबईचे कारभारी आपणच आहोत, गेली २५ वर्षे आपणच तेथील सत्ता उपभोगत आहोत आणि मराठी माणसाच्या दुरवस्थेला आपण जबाबदार आहोत, हे त्यांना स्मरतही नाही.**

निवडणुका जवळ आल्या की मुंबईत राजकीय घोषणांचा धुरळा उडतो. मराठी माणूस, मराठी माणसाची अस्मिता, महाराष्ट्रापासून मुंबई तोडण्याचा कट अशा परिचित घोषणा पुन्हा ऐकू येऊ लागतात. हे मुद्दे सामान्य मुंबईकरांना अजिबात नवे नाहीत, नवे असते ते फक्त त्यांचे पॅकेजिंग. मुंबई मनपा निवडणुकीसाठी महायुतीच्या प्रचाराचा नारळ फोडताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केलेली टीका याच पार्श्वभूमीवर तपासून पाहावी लागेल. ठाकरे यांनी २५ वर्षांत काय केले, हा प्रश्न आहेच. त्याहून महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, मुंबईसाठी नेमके कोण काय करतो आणि कोणाला पुतना मावशीसारखे ममत्व आहे, हाच. मुंबई ही महाराष्ट्राची राजकीय प्रयोगशाळाच. ठाकरेंनी मुंबई महापालिकेवर दीर्घकाळ सत्ता कायम ठेवली. त्या काळात मराठी माणसाचे कोणकोणते प्रश्न मांडले गेले, तसेच ते प्रश्न किती प्रमाणात सुटले, याचे उत्तर ठाकरेंना यंदा द्यावे लागेल. गृहनिर्माण, रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि सार्वजनिक वाहतूक या मूलभूत बाबी आजही मुंबईकरांना मिळालेल्या नाहीत. ज्या मराठी माणसाबद्दल ठाकरेंना अचानक ममत्व दाटून आले, तो मराठी माणूस मुंबईतून केव्हाच हद्दपार झाला आहे. विरार-पालघर तसेच कल्याण-कसारा इथपर्यंत तो लांब फेकला गेला आहे. मुंबईची अक्षरशः बजबजपुरी झाली ती ठाकरेंच्या कार्यकाळातच. दुसरीकडे, सत्ताधारी भाजपा प्रणित महायुती विकासाच्या प्रकल्पांची यादी मांडत आहेत. मेट्रो, कोस्टल रोड, पुनर्विकास योजना या सर्व प्रकल्पांचे महत्त्व नाकारता येणार नाही. मराठी माणूस आज मुंबईत घर घेण्याचे स्वप्नही पाहू शकत नाही, हे दुर्दैवाने खरे आहे. फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांना थेट आव्हान देत मराठी माणसासाठी काय केले? असा जो प्रश्न केला आहे, तो विचारण्याचा नैतिक अधिकार त्यांनाही आहे आणि त्याचे उत्तर देण्याची जबाबदारी ठाकरेंवरही आहे. मुंबई महाराष्ट्रापासून तोडली जाईल, असा प्रचार दरवेळी केला जातो. म्हणूनच, मुख्यमंत्री फडणवीस यांनी ठाकरेंना बोलबच्चन असे संबोधले आहे. मुंबईचा प्रश्न हा मराठी विरुद्ध अमराठी इतकाच मर्यादित नाही. तो वर्ग, संधी आणि न्यायाचाही प्रश्न आहे. मुंबईने सर्वांना सामावून घेतले, पण त्या बदल्यात शहराकडून मिळणाऱ्या सुविधा सातत्याने कमी होत गेल्या. राजकीय पक्षांनी मुंबईला महसूल देणारी यंत्रणा म्हणून पाहिले. याच कारणामुळे मराठी माणूस हा शब्द निवडणूक काळातच जिवंत होतो आणि नंतर तो फाईलमध्ये बंद केला जातो. मुंबईकरांना भावनिक आव्हाने करत ठाकरेंनी आजपर्यंत प्रत्येक निवडणूक लढवली. मात्र, मुंबईकरांच्या हितासाठी नेमके काय केले, हे त्यांनाही सांगता येणार नाही. मुंबईकराला घोषणांपेक्षा उत्तरे हवी आहेत. मराठी माणूस भाषणात नाही, तर धोरणातही केंद्रस्थानी असणार आहे का? हा प्रश्न आहे. उपनगरी रेल्वे वाहतूक मुंबईतील वाढत्या लोकसंख्येला पुरी पडणारी नाही. म्हणूनच, भाजपा सरकारने मेट्रो आणली. तथापि, या मेट्रोला विरोध करण्याचे काम कुणी केले? धारावी पुनर्विकास प्रकल्पात खोडा कुणी घातला? मुंबईतील मराठी शाळा बंद का पडत गेल्या? मराठी माणूस मुंबईपासून लांब का गेला? याचे उत्तर ठाकरेंनाच द्यायचे आहे. आपली सत्ता आणि घराणे राजकारणात कायम रहावे, यासाठी दोन्ही ठाकरे एकत्र आले आहेत. शिवसेना हा पक्ष ठाकरेंच्या हातातून केव्हाच गेला आहे. पक्षाचा वारस हा केवळ घराणेशाहीतून नव्हे तर विचारातून ठरत असतो. म्हणूनच, बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना पुढे घेऊन जाणारे एकनाथ शिंदे यांच्याकडे या पक्षाची मालकी आहे. राज हा वेगळाच विषय. महायुतीने स्पष्ट केले आहे की, मुंबईचा महापौर हा हिंदू आणि मराठीच असेल. ठाकरेंना या प्रश्नांची उत्तरे द्यायलाच लागतील. अन्यथा, मराठी माणसाबद्दलचे त्यांचे प्रेम हे पुतना मावशीचेच आहे, हे पुन्हा एकदा स्पष्ट होईल.

# टेलिकॉम क्षेत्राची एकाधिकारशाहीकडे वाटचाल?

**स्पर्धा कमी झाली की ते बाजारपेठेला सोयीचा वाटते, पण हीच एकाधिकारशाही पुढे अडचणींचे कारण ठरते. विमान वाहतूक क्षेत्रात इंडिगोच्या वाढत्या वर्चस्वातून हे स्पष्ट झाले आहे. अशीच परिस्थिती देशातील टेलिकॉम क्षेत्रात दिसून येत आहे.**




भारताच्या टेलिकॉम क्षेत्राकडे पाहिले, तर ते एकेकाळी मुक्त स्पर्धेचे, कमी दरांचे आणि ग्राहकाभिमुख धोरणांचे प्रतीक असल्याचे मानले जात होते. मोबाइल फोन सर्वसामान्यांच्या हातात पोहोचला, डेटा स्वस्त झाला आणि डिजिटल व्यवहार, शिक्षण, आरोग्य, प्रशासन अशा अनेक क्षेत्रांना टेलिकॉमने गती दिली. मात्र आज हेच क्षेत्र एका निर्णायक वळणावर उभे आहे. स्पर्धा कमी होत चालली आहे, खेळाडू मोजक्याच हातांत केंद्रित झाले आहेत आणि त्याचे परिणाम केवळ उद्योगावर नाही, तर थेट सामान्य ग्राहकांवर होत आहेत. सध्या भारतीय टेलिकॉम बाजारात प्रत्यक्षात दोनच मजबूत खासगी कंपन्या उरल्या आहेत. तिसरा खेळाडू आर्थिक अडचणीत सापडलेला आहे आणि सरकारी कंपनी अजूनही पुनरुज्जीवनाच्या प्रतीक्षेत आहे. ही स्थिती वरवर पाहता स्थैर्याची वाटू शकते, पण आत खोलात पाहिले, तर ती धोक्याची घंटा आहे. कारण कोणत्याही क्षेत्रात स्पर्धा कमी झाली की दर नियंत्रण, सेवा दर्जा आणि नवकल्पना या तिन्ही गोष्टींवर परिणाम होतो. टेलिकॉम सेवा आज केवळ फोन कॉल किंवा इंटरनेटपुरती मर्यादित राहिलेली नाही. आधार, यूपीआय, ऑनलाइन शिक्षण, टेलिमेडिसिन, सरकारी सेवा, ग्रामीण भागातील माहिती पोहोचवणे अशा सगळ्या गोष्टींचा कणा टेलिकॉमवर अवलंबून आहे. त्यामुळे या क्षेत्रात दोनच कंपन्या प्रभावी राहिल्या, तर त्या कंपन्यांचे निर्णय देशाच्या डिजिटल आयुष्यावर थेट परिणाम करणारे ठरतात. दर वाढवायचे की नाही, गुंतवणूक कुठे करायची, कोणत्या भागात नेटवर्क वाढवायचे असे सगळे निर्णय ग्राहकांच्या हिताऐवजी व्यावसायिक सोयींवर आधारित होण्याचा धोका वाढतो. स्पर्धा कमी होण्याचे परिणाम हळूहळू दिसू लागतात. सुरुवातीला दर स्थिर राहतात, पण पर्याय कमी झाल्याने ग्राहकांकडे तक्रार करण्याची किंवा सेवा बदलण्याची ताकद उरत नाही. सेवा दर्जात घसरण झाली तरी ती सहन करण्यावाचून गत्यंतर राहत नाही. नव्या कल्पना, नव्या योजना, ग्राहकांसाठी नावीन्यपूर्ण सेवा देण्याची गरज कमी होते. कारण ग्राहक गमावण्याची भीती उरत नाही. हे चित्र आपण इतर क्षेत्रांत, विशेषतः विमान वाहतूक क्षेत्रात, आधीच पाहिलेले आहे. प्रश्न असा आहे की ही स्थिती निर्माणच का झाली? यामागे अनेक कारणे आहेत. स्पेक्ट्रमचे प्रचंड दर, परवाना शुल्क, नियामक अनिश्चितता, दीर्घकाळ चाललेली किंमतयुद्धे आणि धोरणात्मक चुकांचा हा एकत्रित परिणाम आहे. काही कंपन्या आक्रमक विस्तारात उतरल्या, काही टिकू शकल्या नाहीत. मात्र यात नियामक आणि धोरणकर्त्यांची भूमिका पूर्णपणे निर्दोष म्हणता येणार नाही. बाजार आपोआप सगळे प्रश्न सोडवेल, या गृहितकावर खूप काळ विश्वास ठेवला गेला. आज गरज आहे ती बाजारात अधिक सक्षम खेळाडू टिकून राहतील, अशी परिस्थिती निर्माण करण्याची. याचा अर्थ कमकुवत कंपन्यांना कृत्रिमरीत्या वाचवणे नव्हे, तर स्पर्धेला पोषक असे धोरणात्मक वातावरण तयार करणे. स्पेक्ट्रम शुल्कात सुसूत्रता, दीर्घकालीन धोरण स्थैर्य, पायाभूत सुविधा शेअरिंगला प्रोत्साहन, आणि नव्या तंत्रज्ञानासाठी अनुकूल नियम यांचा यात समावेश होतो. अन्यथा बाजार दोनच कंपन्यांच्या मर्जीत चालणारा बनण्याचा धोका कायम राहील. सरकारी टेलिकॉम कंपनीचे भवितव्यही या चर्चेत महत्त्वाचे आहे. केवळ भावनिक कारणांसाठी नव्हे, तर स्पर्धेचा तोल राखण्यासाठी सरकारी कंपनी सक्षम असणे आवश्यक आहे. ती जर दर्जेदार सेवा देणारी, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि व्यावसायिकदृष्ट्या शिस्तबद्ध असेल, तर खासगी कंपन्यांवरही दबाव राहतो. अन्यथा सरकारी कंपनी केवळ नावापुरती उरते आणि बाजारातील असमतोल अधिक वाढतो. पुढील काळात ५जी, इंटरनेट ऑफ थिंग्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, स्मार्ट शहरे अशा संकल्पनांवर भारताचे डिजिटल भविष्य उभे राहणार आहे. यासाठी मजबूत, विश्वासार्ह आणि स्पर्धात्मक टेलिकॉम क्षेत्र अत्यावश्यक आहे. दोन कंपन्यांवर अवलंबून असलेली डिजिटल अर्थव्यवस्था दीर्घकाळ सुरक्षित ठरू शकत नाही. तांत्रिक बिघाड, व्यावसायिक निर्णय किंवा धोरणात्मक बदल यांचा परिणाम संपूर्ण देशावर होऊ शकतो. म्हणूनच टेलिकॉम क्षेत्रातील चर्चेला फक्त उद्योगातील नफा-तोट्याच्या चौकटीत पाहणे पुरेसे नाही. हा प्रश्न ग्राहकांचे हक्क, डिजिटल समावेश आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या पायाभूत रचनेशी संबंधित आहे. स्पर्धा टिकवणे हा केवळ बाजाराचा नव्हे, तर सार्वजनिक हिताचा मुद्दा आहे. धोरणकर्त्यांनी हे ओळखून दीर्घकालीन दृष्टीने निर्णय घेतले, तरच भारताचे टेलिकॉम क्षेत्र पुन्हा एकदा संतुलित, स्पर्धात्मक आणि ग्राहकाभिमुख होऊ शकेल. अन्यथा आजची सोयीची स्थिरता उद्याची मोठी अडचण ठरू शकते. भारताच्या टेलिकॉम क्षेत्रातील स्पर्धा कमी होत चालल्याचे धोके समजून घ्यायचे असतील, तर विमान वाहतूक क्षेत्राकडे पाहणे उपयुक्त ठरेल. काही वर्षांपूर्वीपर्यंत देशांतर्गत विमानसेवेत अनेक कंपन्या होत्या. तीव्र स्पर्धेमुळे तिकीट दर कमी होते, प्रवाशांना पर्याय होते आणि कंपन्यांना दर्जा टिकवण्याची गरज होती. मात्र हळूहळू इतर कंपन्या बाजारातून बाहेर पडल्या आणि आज परिस्थिती अशी आहे की इंडिगोचा वाटा प्रचंड वाढलेला आहे. वरवर पाहता ही कंपनी कार्यक्षम, वेळेवर आणि किफायतशीर वाटते; पण एकाधिकारशाहीचे परिणाम आता स्पष्टपणे दिसू लागले आहेत. गेल्याच महिन्यात देशातील विमान वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. याच अनुभवातून टेलिकॉम क्षेत्रासाठी धडा घेण्याची गरज आहे. आज टेलिकॉममध्येही अशीच परिस्थिती निर्माण होत आहे. दोन मोठ्या कंपन्यांवर बाजार अवलंबून राहिला, तर उद्या दरवाढ, सेवा मर्यादा किंवा अटी बदलल्या तरी ग्राहकाला ते स्वीकारावे लागेल.

स्पर्धा नसली की बाजार ग्राहकाभिमुख न राहता कंपनीकेंद्री होतो. मजबूत, बहुस्पर्धात्मक आणि संतुलित टेलिकॉम क्षेत्र उभे राहिले, तरच भारताचे डिजिटल भविष्य सुरक्षित, परवडणारे आणि सर्वसमावेशक राहू शकेल.

# सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक जाहिरातींवर करडी नजर

## पिंपरी-चिंचवडमध्ये स्वतंत्र नियंत्रण कक्ष कार्यान्वित; आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार शहरात आदर्श आचारसंहितेची प्रभावी, पारदर्शक आणि काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी महापालिकेच्या वतीने सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक जाहिरात नियंत्रणासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. या कक्षामार्फत इलेक्ट्रॉनिक माध्यमे, केबल नेटवर्क, दूरदर्शन वाहिन्या तसेच फेसबुक, एक्स (ट्विटर), इन्स्टाग्राम, युट्यूब, व्हॉट्सअ‍ॅप, टेलिग्राम आदी डिजिटल प्लॅटफॉर्मवरील राजकीय प्रचारावर बारकाईने लक्ष ठेवण्यात येणार आहे.

आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांच्या देखरेखीखाली ही यंत्रणा कार्यरत करण्यात आली आहे. उपजिल्हाधिकारी तथा महापालिका आचारसंहिता कक्ष प्रमुख सुरेखा माने आणि उपायुक्त तथा नोडल अधिकारी व्यंकटेश दुर्वास यांच्या अधिपत्याखाली नियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आदर्श आचारसंहिता कक्षात कार्यकारी अभियंता विजय भोजने यांच्या अध्यक्षतेखाली उपअभियंता शिरीष पोरेडी, निलेश दाते, हेमंत घोड आणि राहुल जन्नू यांचा समितीत समावेश आहे.

सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांमध्येही आदर्श आचारसंहिता कक्ष कार्यान्वित करण्यात आले असून, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिका मुख्यालयात केंद्रीय नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. निवडणूक अधिसूचना जाहीर झाल्यापासून ते संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत हा कक्ष सतत कार्यरत राहणार आहे.

या नियंत्रण कक्षामार्फत राजकीय पक्ष, उमेदवार किंवा त्यांच्या समर्थकांकडून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती, प्रचार संदेश, पोस्ट, व्हिडिओ, बॅनर तसेच अन्य प्रचार साहित्य हे आदर्श आचारसंहिता आणि राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आहेत की नाही, याची तपासणी व प्रमाणन करण्यात येणार आहे. यासाठी अ व ब प्रभागासाठी उपअभियंता शिरीष पोरेडी, क व ड प्रभागासाठी उपअभियंता निलेश दाते, ई व फ प्रभागासाठी उपअभियंता हेमंत घोड तर ग व ह प्रभागासाठी उपअभियंता राहुल जन्नू यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# ‘मकोका’ कारवाईतील फरार आरोपीची आत्महत्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** हडपसर–सय्यदनगर परिसरातील कुख्यात टिपू पठाण टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई झाल्यानंतर फरार असलेल्या एका सराईत आरोपीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये हडपसरमधील एका माजी नगरसेवकासह अन्य काही व्यक्तींची नावे असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

सादिक हुसेन कपूर (वय ५६, रा. सय्यदनगर, हडपसर) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी लष्कर पोलीस ठाण्यात शनिवारी रात्री उशीरा अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, कपूर याचे लष्कर भागातील इस्ट परिसरातील कुमार पॅलेस सोसायटीत कार्यालय आहे.

### सुसाईड नोटमध्ये माजी नगरसेवकासह काहींची नावे

शनिवारी सायंकाळच्या सुमारास त्याने आपल्या कार्यालयात गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले.

घटनेची माहिती मिळताच लष्कर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. कपूर याला तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

पोलिस तपासात कपूर याने आत्महत्येपूर्वी तब्बल ३० ते ३५ पानी सुसाईड नोट लिहिल्याचे निष्पन्न झाले आहे. ही चिठ्ठी पोलिसांनी जप्त केली असून, त्यामध्ये हडपसरमधील एका माजी नगरसेवकासह काही अन्य व्यक्तींचा उल्लेख असल्याचे समोर आले आहे. सुसाईड नोटमधील मजकुराची सखोल चौकशी सुरू असून, मकोका प्रकरणाशी या आत्महत्येचा संबंध आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत.

# राष्ट्रवादी उमेदवाराच्या मुलावर पैसे वाटपाचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष यांच्यातील राजकीय संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार बाबुराव चांदेरे यांच्या मुलाने मतदारांना पैसे वाटल्याचा गंभीर आरोप भाजपकडून करण्यात आला असून, या प्रकरणामुळे शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

भाजपचे उमेदवार गणेश कळमकर यांनी या कथित प्रकाराबाबत थेट मुख्यमंत्री देवेंद्र

### भाजपकडून तडीपार करण्याची मागणी

फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत माहिती दिल्याचे सांगण्यात येते. निवडणूक आचारसंहितेचा भंग झाल्याचा आरोप करत भाजपच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेतली असून, संबंधित प्रकरणाची तातडीने चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

भाजप कार्यकर्त्यांचा आरोप आहे की, मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी पैसे वाटप करण्यात आले असून, ही लोकशाही प्रक्रियेची थट्टा आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बाबुराव चांदेरे यांच्या मुलांना तडीपार करण्यात यावे, अशी जोरदार मागणी भाजपकडून करण्यात येत आहे. यासंदर्भात निवडणूक आयोग व पोलिस प्रशासनाकडे तक्रार दाखल करण्याची तयारीही सुरू असल्याचे समजते. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसकडून हे आरोप फेटाळले जाण्याची शक्यता असून, राजकीय सूडबुद्धीने भाजपकडून बदनामीचा प्रयत्न केला जात असल्याचा दावा केला जाऊ शकतो. मात्र, या आरोपांमुळे पुण्यातील महापालिका निवडणुकीतील राजकारण अधिक चुरशीचे आणि तणावपूर्ण बनले आहे.

# एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक व शैक्षणिक सादरीकरणाने रंगला कार्यक्रम; देशभक्ती व विकसित भारताचा संदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहपूर्ण वातावरणात आणि दिमाखात पार पडले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व ज्ञानसंपन्नतेला व्यासपीठ देणाऱ्या या कार्यक्रमाला पालक, शिक्षक व मान्यवरांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली.

या स्नेहसंमेलनास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पौर्णिमा त्रिवेदी कुलकर्णी, रिशु अगरवाल आणि बाल कलाकार भार्गव जगताप उपस्थित होते. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थी, शिक्षकवृंद आणि पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन, भूगोल, विकसित भारत, आनंददायी महासागर कथा आणि देशभक्ती अशा विविध विषयांवर आधारित माहितीपूर्ण व प्रभावी सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या अभिनय, नृत्य व सादरीकरणातून सामाजिक जाणीव, राष्ट्रप्रेम आणि पर्यावरणाविषयीचा संदेश ठळकपणे मांडण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत भक्तीगीते, टॉरिन्स म्युझिक बँडचे सादरीकरण, आकर्षक नृत्यप्रकार तसेच नाट्यप्रयोगांनी उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे संपूर्ण सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या समारोपावेळी सर्व विद्यार्थ्यांनी सादर केलेले ‘वंदे मातरम’ हे गीत विशेष आकर्षण ठरले. शाळेचा वार्षिक शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांचा आढावा प्राचार्या डॉ. बिंदू सैनी यांनी वार्षिक अहवालाच्या माध्यमातून मांडला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा राबवत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

# विकास आणि हिंदुत्व ही दोन्ही चाके एकत्र – रवींद्र चव्हाण

## भाजप प्रदेशाध्यक्षांच्या उपस्थितीत पिंपरी-चिंचवडमध्ये प्रचाराचा दणदणीत शुभारंभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** “वसुधैव कुटुंबकम् ही भारतीय संस्कृतीची विचारधारा आज संपूर्ण जग स्वीकारत आहे. अवघी वसुंधरा एक कुटुंब मानणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी जगातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. विकास आणि हिंदुत्व ही दोन्ही चाके एकत्र घेऊन ध्येयपूर्ती करण्याची ताकद फक्त भाजपकडे आहे,” असे ठाम प्रतिपादन भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाच्या प्रचाराचा शुभारंभ शनिवारी (दि. ३) भक्ती शक्ती समूह शिल्प येथे अभिवादन करून करण्यात आला. यावेळी शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, अमित गोरखे, उमाताई खापरे, माजी आमदार अश्विनीताई जगताप, महिला मोर्चा प्रमुख सुजाता पालांडे, माजी खासदार अमर साबळे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व मतदार उपस्थित होते.

रवींद्र चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्याच टप्प्यात पिंपरी-चिंचवड शहराचा स्मार्ट सिटी प्रकल्पात समावेश केला. त्यामुळे शहरातील पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता व डिजिटल सेवा मोठ्या प्रमाणावर विकसित झाल्या. केंद्रात मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकासाचे नियोजन प्रभावीपणे राबवले जात आहे. सबका साथ, सबका विकास हे भाजपाचे ब्रीदवाक्य असून प्रत्येक घटकाला विकासाच्या प्रवाहात आणण्याचा आमचा संकल्प आहे.

“आम्हाला हिंदुत्वाचे नाव घ्यायला भीती वाटत नाही. आमच्या अंगात ताकद आहे आणि ती ताकद फक्त भाजपकडेच आहे. भाजप फक्त मतांच्या राजकारणासाठी नाही, तर राष्ट्रनिर्माणासाठी काम करते,” असे सांगत त्यांनी विरोधकांवरही टीका केली. निवडणूक अवघ्या दहा दिवसांवर येऊन ठेपली असून हे दिवस अत्यंत महत्त्वाचे आहेत. प्रत्येक कार्यकर्त्याने घरोघरी जाऊन प्रचार करून संपूर्ण पॅनल विजयी करावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी बिनविरोध निवडून आलेले रवी लांडगे आणि सुप्रिया चांदगुडे यांचा सत्कार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच विविध पक्षांतून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत करण्यात आले. “केंद्रात व राज्यात आपले सरकार आहे. पुन्हा पिंपरी-चिंचवडमध्ये सत्ता आली, तर विकासकामांसाठी मुबलक निधी उपलब्ध करून दिला जाईल,” असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर अप्रत्यक्ष टीका करताना चव्हाण म्हणाले, “आमच्या कारभारावर टीका करणाऱ्यांना उत्तर देण्यासाठी पैलवान लांडगे समर्थ आहेत. आमदार महेश लांडगे यांनी अजून पैलवानकी सोडलेली नाही.” कार्यक्रमाच्या शेवटी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाचा अजेंडा मतदारांपर्यंत पोहोचवण्याचे आणि नव्याने पक्षात प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन जोमाने प्रचार करण्याचे आवाहन रवींद्र चव्हाण यांनी केले.

# जीन पँट परिधान केल्याच्या कारणावरून महिलेला मारहाण

## सासू, दिर व नातेवाईकांविरुद्ध गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** जीन पँट परिधान केल्याच्या कारणावरून एका महिलेला सासूसह नातेवाईकांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना पद्मावती भागातील तळजाई वसाहतीत उघडकीस आली आहे. या प्रकरणी सासू, दिर आणि इतर नातेवाईकांविरुद्ध सहकारनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ३३ वर्षीय महिलेने पोलिसांकडे फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिलेच्या पतीचे तीन वर्षांपूर्वी निधन झाले असून ती चार मुलांची आई आहे. पतीच्या निधनानंतर उदरनिर्वाहासाठी ती कचरा वेचण्याचे काम करते. ३० डिसेंबर रोजी सायंकाळी महिलेने घरात जीन पँट परिधान केली होती. त्यावेळी तिची मुलगी घरात उपस्थित होती.

काही वेळानंतर सासू तेथे आली. सुनेने जीन पँट घातल्याचे पाहताच सासूने तिच्यावर शिवीगाळ करत चारित्र्यावर संशय व्यक्त केला. यानंतर सासूने सुनेला मारहाण करण्यास सुरुवात केली. या वादात महिलेची मोठी मुलगीही सहभागी झाली. तिने भांडण थांबवण्याऐवजी आईलाच मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. मारहाणीदरम्यान महिला जमिनीवर कोसळली. त्यानंतर दिरानेही तिला मारहाण केली. या हल्ल्यात महिलेचा हात फ्रॅक्चर झाला. गंभीर जखमी अवस्थेत तिला ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचारानंतर महिलेने सहकारनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी सासू, तिची विवाहित मुलगी आणि दिराविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### बेपत्ता शेतकऱ्याचा ओढ्यात मृतदेह आढळून आल्याने हळहळ

**चाकण :** शेतात गवत आणण्यासाठी गेलेला शेतकरी बेपत्ता झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी त्याचा मृतदेह ओढ्याच्या पाण्यात आढळून आला. ही घटना चिंचोशी (ता. खेड) गावाच्या वनहद्दीत घडली. मारुती भिमाजी पवार (वय ७६, रा. चिंचोशी) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. ३० डिसेंबर रोजी ते शेतात गेले होते; मात्र परत न आल्याने शोधमोहीम राबविण्यात आली. अखेर १ जानेवारी रोजी ओढ्यात मृतदेह मिळून आला. प्राथमिक अहवालानुसार बुडून मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी नमूद केले आहे.

### पोलिसांची ४९ गुन्हेगारांवर मकोका कारवाई

**चाकण :** पिंपरी-चिंचवड पोलिसांनी डिसेंबर महिन्यात दहा गुन्हेगारी टोळ्यांतील ४९ गुन्हेगारांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमाअंतर्गत (मकोका) कारवाई केली आहे. या टोळ्यांवर गंभीर स्वरूपाचे एकूण १३८ गुन्हे दाखल आहेत. पोलिसांवर गोळीबाराच्या प्रयत्नाच्या तपासातून दुधानी टोळीसह चाकण औद्योगिक परिसरातील इतर टोळ्यांचा पर्दाफाश झाला.

### रोहकल येथे रस्ते काँक्रीटीकरणाच्या कामाला प्रारंभ

**चाकण :** प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत रोहकल येथे डांबरीकरणाऐवजी ६०० मीटर रस्त्याचे काँक्रीटीकरण सुरू झाले आहे. घाटमाथा ते स्मशानभूमीपर्यंत ५०० मीटर व डायमंड चौकाजवळ १०० मीटर रस्त्याचा समावेश आहे. ग्रामपंचायतीच्या पाठपुराव्यामुळे व खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या सहकार्याने हा बदल करण्यात आला. यामुळे रस्त्याचा दर्जा व टिकाऊपणा वाढणार असून ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

---

### मावळमधील ‘कीर्तन महोत्सव २०२६’मध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन

# कीर्तन महोत्सवातून आध्यात्मिक परंपरेला नवी ऊर्जा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मावळ :** श्री विठ्ठल परिवार मावळ यांच्या वतीने आयोजित ‘कीर्तन महोत्सव २०२६’ या भव्य आध्यात्मिक कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार सहभागी झाले. गेल्या आठ वर्षांपासून सातत्याने आयोजित होत असलेल्या या कीर्तन महोत्सवामुळे मावळ परिसरात एक सुंदर, सशक्त आणि प्रेरणादायी आध्यात्मिक परंपरा रुजली असून, नववर्षाच्या स्वागतासाठी कीर्तनाच्या माध्यमातून केलेली ही सुरुवात निश्चितच समाजासाठी मार्गदर्शक ठरणारी आहे, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले

कार्यक्रमाच्या निमित्ताने अजित पवार यांनी उपस्थित वारकरी बंधू-भगिनींना संबोधित केले. कीर्तन महोत्सवाच्या माध्यमातून संतांचे विचार, शांतता, समृद्धी आणि सद्भावना समाजात कशी नांदेल, याचे प्रभावी दर्शन येथे घडते, असे त्यांनी सांगितले. साधू-संतांचे विचार, शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांची सामाजिक परिवर्तनाची परंपरा हीच महाराष्ट्राची खरी ताकद असून, या विचारांनीच समाज एकसंध ठेवण्याचे काम केले आहे, असेही त्यांनी नमूद केले. याच कार्यक्रमात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अजित पवार यांनी त्यांना विनम्र अभिवादन केले. सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून समाज परिवर्तनाची दिशा दिली. महिलांना समान हक्क, सन्मान आणि प्रतिष्ठा मिळावी, हा विचार केवळ भाषणापुरता न ठेवता तो कृतीत उतरवण्याची गरज असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

या प्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पंगतीत बसून प्रसादरूपी भोजनाचा आस्वाद घेतला. वारकरी परंपरेतील समता, बंधुता आणि आपुलकीचा अनुभव या पंगतीतून मिळतो. या सोहळ्याचा आत्मिक आनंद घेता आला, याचा विशेष आनंद असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. हजारोंच्या संख्येने वारकरी बंधू-भगिनी एकत्र येऊन भक्ती, सेवा आणि संस्कारांचा संदेश देतात, ही बाब अत्यंत समाधानकारक असल्याचे ते म्हणाले. कोरोनासारख्या अत्यंत कठीण काळातही विठ्ठलाचा आशीर्वाद आणि संतांचे विचार समाजासोबत होते. संकटाच्या काळात अध्यात्म, श्रद्धा आणि संस्कृतीनेच माणसाला उभारी दिली, हेच आपल्या संस्कृतीचे खरे बळ असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राला मिळालेला अनमोल वारसा असून, मानवी मूल्यांचा हा खजिना समाजाला योग्य दिशा देण्याचे काम सातत्याने करत आहे, असे त्यांनी नमूद केले. भंडारा डोंगराच्या पायथ्याशी उभारण्यात येणारे संत तुकाराम महाराजांचे भव्य मंदिर या आध्यात्मिक परंपरेला अधिक बळ देईल, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी सांगितले की, अशा उपक्रमांमुळे नव्या पिढीपर्यंत संत विचार पोहोचतील. संस्कृती, अध्यात्म आणि समाजप्रबोधनाची ही परंपरा अखंड सुरू राहावी, हीच पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

कीर्तन महोत्सवाच्या माध्यमातून समाजात भक्ती, एकोपा, समता आणि मानवतेचे संस्कार रुजत असून, मावळ परिसरात ही परंपरा अधिक व्यापक होत आहे. अशा उपक्रमांमुळे समाजाला आध्यात्मिक बळ मिळून सामाजिक सलोखा अधिक दृढ होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

#### महिला भगिनींना समान मान-सन्मान

● कोरोनासारख्या कठीण काळातही विठ्ठलाचा आशीर्वाद आणि संतांचे विचार समाजाला आधार देत राहिले, याकडे लक्ष वेधत त्यांनी वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राला लाभलेला अनमोल वारसा असल्याचे नमूद केले. भंडारा डोंगराच्या पायथ्याशी उभारण्यात येणारे संत तुकाराम महाराजांचे भव्य मंदिर या आध्यात्मिक परंपरेला अधिक बळ देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महिला भगिनींना समान मान-सन्मान आणि प्रतिष्ठा मिळावी, हा विचार कृतीत उतरवण्याचे आवाहन करत संस्कृती, अध्यात्म आणि समाजप्रबोधनाची ही परंपरा अखंड सुरू राहो, अशी प्रार्थना त्यांनी पांडुरंगाच्या चरणी केली.

---

## अभ्यासाचा भोंगा ठरणार देऊळगाव राजे पॅटर्न

### विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दौंड :** देऊळगाव राजे (ता. दौंड) येथे ग्रामपंचायत देऊळगाव राजे व रोटरी क्लब ऑफ दौंड यांच्या संयुक्त सहकार्याने सुरू करण्यात आलेला ‘अभ्यासाचा भोंगा’ हा नावीन्यपूर्ण उपक्रम अल्पावधीतच यशस्वी ठरत असून, या उपक्रमाला विद्यार्थी व पालकांकडून मोठा प्रतिसाद मिळत असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी अमीर शेख यांनी दिली.

मुख्यमंत्री पंचायत राज अभियानांतर्गत सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमामागील मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची शिस्त, सवय आणि संस्कार रुजवणे. सध्याच्या काळात शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा वाढता मोबाईल वापर, पालकांचा टीव्हीकडे असलेला कल तसेच सोशल मीडियामध्ये अडकलेली तरुण पिढी यामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष होत असल्याचे लक्षात आल्यानंतर हा उपक्रम सुरू करण्यात आला. गेल्या १५ दिवसांपासून दररोज सायंकाळी ठीक ७ वाजता गावात भोंगा वाजवण्यात येतो. भोंगा वाजताच विद्यार्थी घरातील टीव्ही व मोबाईलचा वापर थांबवून किमान एक तास अभ्यासाला बसतात. या काळात पालकांनीही मुलांवर लक्ष ठेवायचे, अशी संकल्पना या उपक्रमामागे आहे. विशेष म्हणजे प्राथमिक, माध्यमिक तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, पालकांचेही सक्रिय सहकार्य लाभत आहे.

---

## आळंदीत नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचा रथोत्सव हरिनाम गजरात संपन्न

### भव्य रथ, पुष्पवृष्टी, आतषबाजी आणि भक्तीमय वातावरणात नगरप्रदक्षिणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** आळंदीत श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज यांच्या वार्षिकोत्सवानिमित्त पारंपरिक रथोत्सव मोठ्या भक्तिभावात आणि हरिनाम गजरात पार पडला. ‘श्री विठ्ठल, श्री विठ्ठल’ नामजयघोषात भाविकांनी श्रींचा रथ हाताने ओढत सेवा बजावली. मार्गावर रांगोळ्यांच्या पायघड्या, विद्युत रोषणाईने सजवलेला भव्य रथ, पुष्पवृष्टी आणि फटाक्यांची आतषबाजी यामुळे संपूर्ण आळंदी भक्तिरसात न्हाऊन निघाली.

श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज मठ येथून रथोत्सवाची नगरप्रदक्षिणा सुरू झाली. रथोत्सव मार्गावर भाविकांनी



मोठी गर्दी केली होती. श्रींच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त मुक्तद्वार अन्नसंतर्पण (महाप्रसाद) आयोजित करण्यात आला होता. याचा लाभ घेण्यासाठी भाविकांची लक्षणीय उपस्थिती दिसून आली.

रथोत्सवाच्या नियोजनासाठी आळंदी पोलीस स्टेशन आणि वाहतूक पोलिसांनी प्रभावी बंदोबस्त ठेवला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक मच्छिंद्र शेंडे, भीमा घुंडरे, पोलीस मित्र योगेश जाधव यांच्यासह पोलिसांनी चोख व्यवस्था राखली. ग्रामस्थांनीही रथोत्सवात सेवाभावाने सहभाग घेतला.

नगरप्रदक्षिणा मार्गावर श्रींचे स्वागत करण्यासाठी विविध ठिकाणी पुष्पहार, आरती व प्रसाद अर्पण करण्यात आला. ग्रामस्थ मानकरी रानवडे परिवाराने परंपरेने नगरखाना सेवा दिली. श्रींचे पुजारी सुधीर गांधी, सुरेश गांधी, गजानन गांधी व गांधी परिवार, तसेच अवधूत महाराज चक्रांकित परिवार यांच्या उपस्थितीत मूळपीठावर श्रींची पूजा करण्यात आली.

---

## जुन्नर न्यायालयात सावित्रीबाई फुले जयंती व महिला मुक्ती दिन उत्साहात साजरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** दि. ०३ जानेवारी २०२६ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व महिला मुक्ती दिनाचे औचित्य साधून तालुका विधी सेवा समिती जुन्नर व जुन्नर वकील बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जुन्नर न्यायालय परिसरात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम मा. श्री. एस. बी. शेलार साहेब (जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, जुन्नर) यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमास मा. श्री. ए. एम. हुसेन साहेब, मा. श्रीमती नम्रता बिरादार साहेब, मा. श्रीमती श्रेया जैन साहेब तसेच जुन्नर वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. हेमंत हाडवळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीस क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना मा. शेलार साहेब यांनी सावित्रीबाई फुले यांनी स्त्री स्वातंत्र्य, सामाजिक समता व महिला सक्षमीकरणासाठी केलेले कार्य भारतीय समाजाच्या इतिहासात अत्यंत मोलाचे असल्याचे प्रतिपादन केले. तसेच मा. नम्रता बिरादार व मा. श्रेया जैन यांनी महिला सन्मान, अधिकार, महिलांसमोरील आव्हाने व सबलीकरण यावर सविस्तर मार्गदर्शन केले. ॲड. तब्बूसम पठाण, ॲड. सवर्णा कानसकर, ॲड. शमीम इनामदार व ॲड. प्रगती गाडेकर यांनीही विचार मांडले.

कार्यक्रमात उपस्थित सर्व महिलांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. निलीमा शेरकर यांनी, तर आभार प्रदर्शन ॲड. तृप्ती परदेशी यांनी केले. या कार्यक्रमास वकील, महिला कर्मचारी व महिला पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## रुईतील श्री बाबीर विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इंदापूर :** रुई (ता. इंदापूर) : येथील श्री बाबीर विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त तसेच कै. आत्माराम बाबुराव पाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सावित्रीबाईंच्या लेकींच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व कै. आत्माराम बाबुराव पाटील यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. कार्यक्रमास विद्यालय परिसरात उत्साहपूर्ण वातावरण अनुभवायला मिळाले.

➕ विद्यार्थिनींच्या हस्ते प्रतिमापूजन; सावित्रीबाईंच्या विचारांना उजाळा

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रुई गावच्या माजी सरपंच व विद्यालयाच्या शिक्षिका मीरादेवी अजितसिंह पाटील या उपस्थित होत्या. प्रारंभी प्रतिमापूजनानंतर दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षण, सामाजिक समता व महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला.

कार्यक्रमात विद्यालयातील श्रद्धा भगत, शिवानी मार्कड, उर्मिला शिंदे, श्रावणी मरकड, अमृता खंडागळे आदी विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांचे विचार प्रभावीपणे मांडले. त्यांच्या भाषणातून स्त्री शिक्षणाचे महत्त्व, अन्यायाविरुद्ध लढा आणि समाजपरिवर्तनातील सावित्रीबाईंचे योगदान अधोरेखित झाले. विद्यार्थिनींच्या विचारप्रस्तुतीने उपस्थितांमध्ये प्रेरणा निर्माण झाली.

यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक जगन्नाथ पाटील यांनी आपल्या मनोगतात सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य आजही समाजाला दिशा देणारे असल्याचे सांगितले. शिक्षिका ललिता लवटे मॅडम, दत्तात्रय जाधव यांनीही सावित्रीबाईंच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात मीरादेवी पाटील यांनी स्त्री शिक्षणामुळेच समाज प्रगत होतो, हा संदेश सावित्रीबाईंनी कृतीतून दिला असल्याचे नमूद केले. याप्रसंगी शिक्षकेतर संघटनेचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय काळे हेही उपस्थित होते.

---

## भिगवणला मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कागदावरच?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भिगवण :** शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या महत्वाकांक्षी अभियानाचा उद्देश जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींची कार्यक्षमता वाढवणे, त्यांच्या कामगिरीनुसार प्रोत्साहन देणे, स्पर्धात्मक वातावरणातून नवचैतन्य निर्माण करणे तसेच शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून नागरिकांना थेट लाभ देणे हा आहे. मात्र भिगवण ग्रामपंचायत हद्दीत हे अभियान अद्याप प्रत्यक्षात न उतरता कागदावरच मर्यादित राहिल्याचे चित्र दिसून येत आहे.

या अभियानाअंतर्गत नागरिकांना सुलभ सेवा देणे, आरोग्य, शिक्षण, उपजीविका यासारख्या क्षेत्रांत सुधारणा करणे, ग्रामपंचायतीच्या ‘आपले सरकार सेवा केंद्रा’तून विविध शासकीय सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देणे, नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निवारण करणे, ग्रामपंचायतीची स्वतंत्र वेबसाईट तयार करून त्यावर सर्व माहिती प्रसिद्ध करणे, गावात सीसीटीव्ही बसविणे, पात्र लाभार्थ्यांना आयुष्मान भारत कार्ड देणे अशी शेकडो कामे अपेक्षित आहेत. मात्र याबाबत भिगवण ग्रामपंचायतकडून अद्याप कोणतीही व्यापक जनजागृती किंवा ठोस कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

नुकत्याच पार पडलेल्या ग्रामसभेत ग्रामस्थांनी या अभियानाच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित केला असता ग्रामपंचायत अधिकारी दत्तात्रय परदेशी समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. सध्या थकीत घरपट्टी व पाणीपट्टीवर ५० टक्के करसवलत योजना वगळता अभियानाशी संबंधित बहुतांश बाबी प्रत्यक्षात राबविल्या जात नसल्याची भावना ग्रामस्थांमध्ये आहे. त्यामुळे हे अभियान केवळ कागदावरच राहणार की त्याची प्रभावी अंमलबजावणी होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाकडे इंदापूरचे गटविकास अधिकारी व पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कितपत गांभीर्याने लक्ष देतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

---

## तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्ग सुधारणा; मोंटेकार्लो कंपनीला निविदेत यश

### एमएसआयडीसी लवकरच कामाला सुरुवात करणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गाच्या चौपदरीकरण व सुधारणा कामाला अखेर सुरुवात करण्याची तयारी झाली आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळाने (एमएसआयडीसी) पुणे जिल्ह्यातील दोन महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांना मान्यता दिली असून, यात तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्ग व हडपसर-यवत महामार्ग यांचा समावेश आहे.

उर्से, तळेगाव, चाकण, शिक्रापूर, रांजणगाव एमआयडीसी आणि मुंबईकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा असून, औद्योगिक वसाहतीतून अनेक अवजड वाहने जात असल्याने वाहतुकीचा ताण प्रचंड वाढला होता. डांबरीकरणाचे काम रखडल्यामुळे वाहतूक कोंडी ही मोठी समस्या बनली होती.



आता या मार्गावरचे रुंदीकरण व दुरुस्तीचे काम सुरू होणार आहे.

एकूण ५३.२०० किमी लांबीच्या या रस्त्याचे सुधारणा प्रकल्प दोन टप्प्यात पार पडणार आहेत. यातील २४.२०० किमीचा टप्पा उन्नत पद्धतीने तयार केला जाईल तर उर्वरित टप्पा जमिनीच्या पातळीवर राहील. काही महिन्यांपूर्वी या प्रकल्पासाठी निविदा मागवल्या होत्या. चार कंपन्यांनी निविदा सादर केल्या, त्यात मोंटेकार्लो लिमिटेडने ६२२१.९५ कोटी रुपयांची सर्वात कमी रक्कम देऊन बाजी मारली.

सर्वाधिक ७००८.५२ कोटी रुपयांची निविदा अशोका बिल्डकॉनने सादर केली होती. आता निविदा अंतिम मान्यतेसाठी राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार असून, मंजुरी मिळाल्यानंतर महिन्याभरात प्रकल्पाला सुरुवात होणार आहे. एमएसआयडीसीचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, दोन ते तीन वर्षांत काम पूर्ण होऊन प्रवासी आणि वाहनचालकांचा प्रवास सुलभ होईल, वाहतूक कोंडी कमी होईल आणि औद्योगिक वाहतुकीस गती मिळेल.

---

## एकाच रात्री दोन गावांत चोरीचा थरार; सोन्या-चांदीच्या दुकानांवर चोरट्यांचा डल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पाबळ :** धामारी आणि मुखई या दोन गावांमध्ये एकाच रात्री चोरट्यांनी धाडसी पद्धतीने चोरी करत परिसरात खळबळ उडवून दिली आहे. सोन्या-चांदीच्या दुकानांना लक्ष्य करत चोरट्यांनी नियोजनबद्ध कारवाई केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

धामारी येथे रात्री उशिरा ते पहाटेच्या दरम्यान चोरट्यांनी एका सोन्या-चांदीच्या दुकानाचे लोखंडी शटर उचकटून आत प्रवेश केला. दुकानात शिरल्यानंतर त्यांनी मौल्यवान सोन्याचे व चांदीचे दागिने चोरून नेले. सकाळी दुकान उघडण्यासाठी आल्यानंतर हा चोरीचा प्रकार उघडकीस आला.

➕ धामारी व मुखई परिसरात नियोजनबद्ध चोरी; व्यापारी व नागरिकांमध्ये भीती

त्याच रात्री मुखई येथेही अशाच प्रकारची चोरी झाली. येथे चोरट्यांनी दुकानाच्या लोखंडी खिडकीचे रॉड कट करून दुकानात प्रवेश केला. त्यानंतर दुकानातील सोन्या-चांदीच्या दागिन्यांवर हात साफ करत चोरटे पसार झाले. दोन्ही ठिकाणी चोरीची पद्धत पाहता चोरट्यांनी परिसराची आधीच रेकी करून ही कारवाई केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. एकाच रात्री दोन गावांमध्ये झालेल्या या चोऱ्यांमुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे. परिसरातील व्यापाऱ्यांनी रात्रीची पोलीस गस्त वाढवावी व इतर सुरक्षेच्या उपाययोजना कडक करण्याची मागणी केली आहे.

---

### कांद्याच्या भावात वाढ, बटाट्याचे दर घसरले; पालेभाज्यांच्या भावात नरमाई

# चाकण बाजारात कांदा-बटाट्याची मोठी आवक; उलाढाल ६ कोटी ३० लाखांवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्डमध्ये रविवारी (दि. ४ जानेवारी २०२६) कांदा, बटाटा, वाटाणा व गाजराची मोठ्या प्रमाणावर आवक झाली. एकूण बाजार उलाढाल सुमारे ६ कोटी ३० लाख रुपयांपर्यंत पोहोचली. वाढलेल्या आवकेमुळे काही भाज्यांच्या भावात घसरण झाली असून काही शेतीमालाचे दर स्थिर राहिले आहेत.

चाकण बाजारात कांद्याची एकूण ५ हजार क्विंटल आवक झाली. कांद्याचा कमाल भाव मागील बाजाराच्या तुलनेत वाढून



चाकण बाजारात कांद्याची मोठ्या प्रमाणावर झालेली आवक.

१,८०० रुपयांवरून २,००० रुपये प्रति क्विंटलपर्यंत गेला. सरासरी भाव १,२०० रुपये असून कमी प्रतीचा कांदा ८०० रुपयांपर्यंत विकला गेला. बटाट्याची आवक ३,००० क्विंटल झाली असून मागील आठवड्याच्या तुलनेत सुमारे १ हजार क्विंटलने वाढ झाली आहे. मात्र, वाढलेल्या आवकेमुळे बटाट्याचा कमाल भाव २,००० रुपयांवरून १,५०० रुपयांवर स्थिरावला.

लसणाची आवक ४० क्विंटलवर स्थिर राहिली; मात्र भावात घसरण होऊन दर १०,००० रुपयांवरून ८,००० रुपयांपर्यंत आले. हिरव्या मिरचीची १२८ क्विंटल आवक झाली असून तिला ४,५०० ते ५,५०० रुपये दर मिळाला. राजगुरुनगर येथील मुख्य बाजारात ढोबळी मिरची, फ्लॉवर, कोबी, काकडी व भोपळ्याची आवक वाढल्याचे चित्र दिसून आले.

फळभाज्यांमध्ये टोमॅटो (२,५०० ते ३,५००), कोबी (७०० ते १,०००), फ्लॉवर (१,००० ते १,५००), वांगी (२,००० ते ३,०००), भेंडी (३,००० ते ५,०००) असे दर नोंदवले गेले. वाटाण्याची ५२५ क्विंटल आवक झाली असून त्याला २,५०० ते ३,००० रुपये भाव मिळाला.

पालेभाज्यांच्या बाजारात कोथिंबीर, मेथी, शेपू व पालक यांची मोठी आवक झाल्याने भावात नरमाई आली. दरम्यान, जनावरांच्या बाजारात गाई, बैल, म्हशी तसेच शेळ्या-मेंढ्यांची चांगली विक्री झाली.

## सारांश वृत्त

### राजस्थानमध्ये थंडीची लाट कायम

**जयपूर :** राजस्थानमधील काही ठिकाणी रविवारी सकाळी मध्यम ते दाट धुके होते जिथे फतेहपूर हे सर्वात थंड ठिकाण होते जिथे किमान तापमान १.१ अंश सेल्सिअस होते. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, पूर्व राजस्थानमधील काही ठिकाणी थंडीची लाट नोंदली गेली. सिकरमध्ये किमान २.५ अंश, त्यानंतर लुंकरनसरमध्ये २.८ अंश, वनस्थळीमध्ये ४ अंश आणि सिरोही, पाली आणि चुरूमध्ये प्रत्येकी ४.४ अंश तापमानाची नोंद झाली.



### काश्मीर खोऱ्यात तापमानात घट

**श्रीनगर :** काश्मीर खोऱ्यातील किमान तापमानात दोन अंशांनी घट झाल्याने थंडीची लाट तीव्र झाली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. शनिवारी रात्री श्रीनगरमध्ये किमान तापमान उणे ३.२ अंश सेल्सिअस नोंदवले गेले, जे आदल्या रात्रीच्या उणे १.५ अंश सेल्सिअसपेक्षा कमी आहे, असे त्यांनी सांगितले. उत्तर काश्मीरमधील प्रसिद्ध स्की रिसॉर्ट गुलमर्ग हे सर्वात थंड ठिकाण राहिले, सलग दुसऱ्या रात्री किमान तापमान उणे ६.५ अंश सेल्सिअसपर्यंत घसरले तर दक्षिण काश्मीरमधील पहलगाम या पर्यटन रिसॉर्टमध्ये उणे ५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

### गुवाहाटीमध्ये वस्त्रोद्योग मंत्र्यांची राष्ट्रीय बैठक

**गुवाहाटी :** वस्त्रोद्योग मंत्र्यांची राष्ट्रीय परिषद गुरुवारपासून गुवाहाटी येथे 'भारताचे वस्त्रोद्योग: विणकाम वाढ, वारसा आणि नवोपक्रम' या थीमसह आयोजित केली जाईल, असे एका अधिकाऱ्याने येथे सांगितले. राज्य सरकारच्या सहकार्याने वस्त्रोद्योग मंत्रालयाने या दोन दिवसांच्या परिषदेचे आयोजन केले आहे. या परिषदेचे उद्दिष्ट भारताला जागतिक वस्त्रोद्योग उत्पादन केंद्र म्हणून स्थान देण्यासाठी समन्वित राष्ट्रीय रणनीतीवर चर्चा करण्यासाठी केंद्रीय आणि राज्य वस्त्रोद्योग मंत्री आणि केंद्र आणि राज्य सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना एकत्र आणणे आहे.

### माजी पोलीस महासंचालक एस पी वैद यांची मागणी

# पाकी मुनीर यांना उचलून भारतात आणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना त्यांच्या घरातून अटक करवली. मादुरो आणि त्यांची पत्नी झोपलेले असताना त्यांच्या बेडरुममध्ये घुसून अमेरिकेच्या सैनिकांनी त्यांना अटक केली. भारतानेही आता फार काळ वाट न पाहाता अमेरिकेप्रमाणेच निर्णय घ्यावा आणि पाकिस्तानी लष्करप्रमुख जनरल आसिम मुनीर आणि त्यांच्या पत्नीला अटक करावी अशी मागणी जम्मू काश्मीरच्या माजी पोलीस महासंचालकांनी केली आहे. पाकिस्तानी लष्करप्रमुख जनरल आसिम मुनीर आणि त्यांच्या पत्नीला अटक करण्यासाठी 'ऑपरेशन सिंदूर २' राबवावे, अशी मागणी त्यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टद्वारे केली आहे. या पोस्टमध्ये जम्मू-काश्मीरचे माजी



पोलीस महासंचालक एस. पी. वैद यांनी भारतानेही आता आपली रणनीती बदलण्याची वेळ आली असल्याचे म्हटले आहे.

जम्मू-काश्मीरचे माजी पोलीस महासंचालक एस. पी. वैद यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, ट्रम्प यांनी व्हेनेझुएलामध्ये जे केले, ते पारंपारिक युद्ध नव्हते. अमेरिकन स्पेशल फोर्सेसने थेट राष्ट्राध्यक्षांच्या निवासस्थानात घुसून त्यांना ताब्यात घेतले आणि अमेरिकेत आणले. जर अमेरिका युद्ध पुकारल्याशिवाय एखाद्या देशाच्या प्रमुखाला त्यांच्या गुन्ह्यांसाठी अटक करू शकते, तर भारताला पाकिस्तानातील दहशतवादाचे मुख्य सूत्रधार आसिम मुनीर यांच्यावर कारवाई करण्यापासून कोणी रोखू नये. ट्रम्प यांनी आखून दिलेली ही नवीन ओळ भारतासाठी एक मोठी संधी असल्याचे वैद यांचे म्हणणे आहे

बलोचिस्तानमध्ये स्वातंत्र्याची मागणी करणाऱ्या नागरिकांवर आणि विद्यार्थ्यांवर पाकिस्तानी लष्कर अमानुष अत्याचार करत आहे. मुनीर यांना पदावरून हटवणे ही बलोच जनतेसाठी मोठी सुटका ठरेल. पाकव्याप्त काश्मीरमध्ये महागाई आणि मूलभूत सुविधांच्या अभावामुळे होणारी आंदोलने मुनीर यांचे लष्कर दडपून टाकत आहे. खैबर पख्तूनख्वा या भागात पश्तून समुदायाविरुद्ध सुरू असलेल्या मोहिमांमुळे गृहयुद्धासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे, मुनीर यांच्यावर खटला चालला पाहीजे, वैद यांची मागणी आहे.

जनरल मुनीर हे केवळ भारतामध्ये घडवून आणल्या जात असलेल्या दहशतवादी कारवायांना प्रोत्साहन देत नसून ते पाकिस्तानमध्येही उचापती करत आहेत असे वैद यांचे म्हणणे आहे. पाकिस्तानच्या जनतेच्या दृष्टीनेही मुनीर हे एकप्रकारे गुन्हेगार असून त्यांच्यावर खटला चालवणे गरजेचे असल्याचे वैद यांचे म्हणणे आहे. मे २०२५ मध्ये झालेल्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या कारवाईने पाकिस्तानला आधीच धक्का दिला होता. आता त्याच्या दुसऱ्या टप्प्यात थेट लष्करप्रमुखांना लक्ष्य केल्यास रावळपिंडीतील लष्करी सत्तेला मोठा हादरा बसेल. पाकिस्तान हा आण्विक शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेला देश असला, तरी सार्वभौमत्वाचा बहाणा गुन्हेगारांना वाचवू शकत नाही, हे अमेरिकेने सिद्ध केले आहे, त्यामुळे भारतानेही तसेच करावे असे वैद यांचे म्हणणे आहे.

ट्रम्प यांनी व्हेनेझुएलामध्ये जे केले ते पारंपारिक युद्ध नव्हते. त्यांनी आपले विशेष सैन्य पाठवले, राष्ट्रपती राजवाड्यावर किंवा त्यांच्या निवासस्थानावर हल्ला केला आणि अध्यक्ष आणि त्यांच्या पत्नीला अटक केली. एसपी वैद या मॉडेलबद्दल बोलत आहेत. त्यांचा युक्तिवाद आहे की अमेरिका युद्ध घोषित न करता राष्ट्रप्रमुखांना अटक करू शकते, तर भारत का करू शकत नाही? पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाचे पुरावे सर्वज्ञात आहेत, असेही त्यांनी म्हटले आहे.

## उत्तरेला थंडीचा कडाका कायम; जनजीवन प्रभावित

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** रविवारी उत्तर, मध्य आणि पूर्व भारतातील मोठ्या भागात कडाक्याची थंडी सुरूच राहिली, थंडीच्या लाटा, दाट धुके आणि बर्फवृष्टीमुळे अनेक राज्यांमध्ये दैनंदिन जीवन आणि वाहतूक सेवा विस्कळीत झाल्या.

राजधानी दिल्लीत किमान तापमान ७.४ अंश सेल्सिअस नोंदवले गेले, तर हवेची गुणवत्ता 'खराब' श्रेणीत राहिली. भारतीय हवामान खात्याच्या मते, ६ जानेवारीपर्यंत शहरातील काही भागात थंडीची लाट येण्याची शक्यता आहे. किमान तापमान सामान्यपेक्षा ४.५ ते ६.५ अंश सेल्सिअस कमी झाले की थंडीची लाट जाहीर केली जाते.

शहराचे बेस स्टेशन असलेल्या सफदरजंगमध्ये किमान ७.४ अंश सेल्सिअस, तर पालममध्ये ६.८ अंश, लोधी रोडमध्ये ७.६ अंश, रिजमध्ये ८.९ अंश आणि अयानगरमध्ये ६.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. सकाळी ८.३० वाजता सापेक्ष आर्द्रता ९२ टक्के होती. कमाल तापमान १७ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची अपेक्षा आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार, दिल्लीचा हवा गुणवत्ता निर्देशांक सकाळी ९ वाजता २९९ होता, ज्यामुळे तो 'खराब' श्रेणीत आला.

जम्मू आणि काश्मीरमध्येही थंडीची लाट वाढली आहे, जिथे काश्मीर खोऱ्यात ४० दिवसांच्या सर्वात कडक हिवाळ्याच्या काळात तापमानात आणखी घट झाली आहे. श्रीनगरमध्ये किमान तापमान उणे ३.२ अंश सेल्सिअस नोंदवले गेले, जे आदल्या रात्री उणे १.५ अंश होते. गुलमर्ग सलग दुसऱ्या रात्री उणे ६.५ अंश सेल्सिअससह सर्वात थंड ठिकाण राहिले, तर पहलगाममध्ये उणे ५ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. काझीगुंडमध्ये उणे ४ अंश, कुपवाडामध्ये उणे २.५ अंश आणि कोकरनागमध्ये उणे १.६ अंश तापमानाची नोंद झाली.

## व्हेनेझुएलातील परिस्थितीबद्दल भारताची चिंता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना अमेरिकन सैन्याने केलेल्या अटकेबद्दल आणि तेथे निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीबद्दल भारताने निवेदन जारी करून चिंता व्यक्त केली आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने एक अधिकृत निवेदन जारी करून व्हेनेझुएलातील घडामोडींवर तीव्र चिंता व्यक्त केली आणि सर्व पक्षांना शांतता राखण्याचे आवाहन केले.

परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारत व्हेनेझुएलातील वेगाने बदलणाऱ्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. भारताने स्पष्ट केले की त्यांची प्राथमिकता या प्रदेशाची स्थिरता आणि तेथील लोकांची सुरक्षा आहे. सर्व संबंधित पक्षांना वादग्रस्त मुद्दे संवादाद्वारे शांततेने सोडवण्याचे आवाहन ते करते. या प्रदेशात शांतता आणि स्थैर्य सुनिश्चित करणे आवश्यक आहे. व्हेनेझुएलामध्ये राहणाऱ्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेबाबतची परिस्थितीही परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केली आहे. कराकसमधील भारतीय दूतावास तेथील भारतीय समुदायाच्या संपर्कात आहे. भारतीयांना सर्वतोपरी मदत आणि मार्गदर्शन करत राहण्याचे निर्देश दूतावासाला देण्यात आले आहेत.

परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की, व्हेनेझुएलातील अलिकडच्या घडामोडी ही गंभीर चिंतेची बाब आहे. आम्ही परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहोत. व्हेनेझुएलाच्या लोकांच्या कल्याणासाठी आणि सुरक्षिततेसाठी भारत आपला पाठिंबा पुन्हा एकदा जाहीर करतो. आम्ही सर्व संबंधित पक्षांना संवादाद्वारे शांततेने समस्या सोडवण्याचे आवाहन करतो, जेणेकरून या प्रदेशात शांतता आणि स्थिरता कायम राहील. कराकसमधील भारतीय दूतावास भारतीय समुदायाच्या संपर्कात आहे आणि सर्वतोपरी मदत करत राहील. सरकारने आपल्या नागरिकांसाठी एक सूचना जारी केली, ज्यामध्ये व्हेनेझुएलाचा अनावश्यक प्रवास टाळण्याचा सल्ला देण्यात आला.

## देशविरोधी कारवाया; मौलवीला अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राजस्थानमधील जैसलमेर येथील दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) एका मोठ्या कारवाईत एका मौलवीला ताब्यात घेतले आहे. त्याच्यावर संशयास्पद कारवायांमध्ये सहभागी असल्याचा आरोप आहे. राजस्थान एटीएस आता त्याला जयपूरला घेऊन गेले आहे, जिथे चौकशीतून महत्त्वाची माहिती मिळू शकते. विशेष म्हणजे, अटक करण्यात आलेला मौलवी उत्तर प्रदेशचा आहे आणि त्याच्यावर संशयास्पद देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी असल्याचा आरोप आहे.

जैसलमेर भारत-पाकिस्तान सीमेजवळ असल्याने संशयाला आणखी बळकटी मिळाली आहे. वृत्तानुसार, राजस्थान दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) शनिवारी रात्री जैसलमेर जिल्ह्यातील तनोट-किशनगढ भागातील कुरिया बेरी गावातून एका मौलवीला ताब्यात घेतले. हा मौलवी देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी असू शकतो या संशयामुळे एजन्सी हाय अलर्टवर आहेत. सीमावर्ती भागात संशयास्पद कारवाया होत असल्याची गुप्त माहिती एटीएस पथकाला मिळाली. या माहितीवरून कारवाई करत शनिवारी रात्री तनोट-किशनगढमधील कुरिया बेरी गावात छापा टाकण्यात आला. मूळ उत्तर प्रदेशातील एका ४५ वर्षीय मौलवीला अटक करण्यात आली. तो धार्मिक कर्तव्ये पार पाडण्याच्या नावाखाली गावात राहत होता. एटीएसने संपूर्ण कारवाई इतकी गुप्त ठेवली की रात्री उशिरापर्यंत स्थानिक रहिवासीही अनभिज्ञ राहिले. तथापि, सकाळपर्यंत गावात बातमी पसरली आणि लोक आता या कारवाईची विविध प्रकारे चर्चा करत आहेत.

अटक केलेल्या मौलवीचे सीमापार (पाकिस्तान) संबंध असल्याचा किंवा काही संशयास्पद कारवायांमध्ये सहभाग असल्याचा संशय आहे. सुरुवातीच्या चौकशीत काही विशिष्ट बाबी उघड झाल्या, ज्यामुळे त्याला जयपूर येथील एटीएस मुख्यालयात नेण्यात आले, जिथे तज्ज्ञांची एक टीम त्याची सखोल चौकशी करेल. राजस्थान एटीएसने अद्याप या संदर्भात लेखी निवेदन जारी केलेले नाही; ते म्हणतात की ते सखोल चौकशीनंतरच सविस्तर माहिती देतील. जैसलमेर सीमा सुरक्षेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची आहे. तनोट आणि लोंगेवाला सारख्या भागात यापूर्वी हेरगिरी आणि घुसखोरीचे प्रयत्न झाले आहेत. राजस्थान एटीएसने सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये अनेक कारवाया केल्या आहेत, यात आयएसआयसाठी काम करणाऱ्या संशयितांना अटक करण्यात आली आहे.

## जी राम जी विरोधात काँग्रेसचे आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने जी राम जी कायदा मागे घ्यावा आणि मनरेगाला हक्कांवर आधारित कायदा, काम करण्याचा अधिकार आणि पंचायतींचे अधिकार म्हणून पुनर्संचयित करावे या मागणीसाठी काँग्रेसने शनिवारी १० जानेवारीपासून देशव्यापी 'मनरेगा बचाओ संग्राम' (मनरेगा वाचवा मोहीम) चा पहिला टप्पा जाहीर केला.



संयुक्त पत्रकार परिषदेला संबोधित करताना, काँग्रेसचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल आणि जयराम रमेश म्हणाले की, नवीन जी राम जी कायद्याद्वारे, केंद्राने संपूर्ण केंद्रीकरण सुनिश्चित केले आहे. नवीन कायद्यांतर्गत रोजगार हा आता अधिकार राहणार नाही, ज्याला न्यायालयात आव्हान दिले जाईल, असे त्यांनी सांगितले. मनरेगा बचाव आंदोलन १० जानेवारीपासून सुरू होईल आणि २५ फेब्रुवारीपर्यंत ते चालेल.

वेणुगोपाल म्हणाले की, नवीन कायद्याची अंमलबजावणी थांबवण्यासाठी काँग्रेस कायदेशीर मार्गांसह सर्व पर्यायांचा शोध घेईल. इंडिया आघाडीतील शासित राज्ये नवीन कायद्याची अंमलबजावणी करणार नाहीत की त्याला विरोध करणार नाहीत, असे सांगून वेणुगोपाल म्हणाले की, काँग्रेस आघाडीतील सर्व घटक पक्षांशी सल्लामसलत करेल. विरोधी पक्षांच्या मुख्यमंत्र्यांमध्ये एकमत होईल आणि याबाबत पुढे कसे जायचे याची शक्यता आम्ही शोधू, असे वेणुगोपाल यांनी सांगितले. रमेश यांनी असा दावा केला की भाजपशासित कोणतेही राज्य जी राम जी कायदा लागू करण्याच्या स्थितीत नाही, जो त्यांच्या मते देशाच्या संघराज्य रचनेविरुद्ध आहे. वेणुगोपाल यांनी या कायद्याला संघराज्य रचनेवरच हल्ला असल्याचे म्हटले आहे.

### भारतातील ऊर्जा पूर्णपणे सुरक्षित

## व्हेनेझुएलाचा परिणाम होणार नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** व्हेनेझुएलातील सध्याच्या संकटाचा भारतावर कोणताही भौतिक आर्थिक किंवा ऊर्जा परिणाम होण्याची शक्यता कमी आहे, असे भारतस्थित थिंक टँक ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह (जीटीआरआय) ने प्रतिपादन केले आहे.

जीटीआरआयने एका नोटमध्ये असे म्हटले आहे की २००० आणि २०१० च्या दशकात भारत व्हेनेझुएलाच्या क्रूड तेलाचा एक प्रमुख खरेदीदार होता. ओएनजीसी विदेश सारख्या भारतीय कंपन्यांनी ओरिनोको बेल्टमध्ये अपस्ट्रीम हिस्सेदारी ठेवली होती. अमेरिकेच्या निर्बंधांमुळे २०१९ पासून द्विपक्षीय संबंध झपाट्याने कमकुवत झाले आहेत, ज्यामुळे भारताला दुय्यम निर्बंध टाळण्यासाठी तेल आयात कमी करावी लागली आणि व्यावसायिक क्रियाकलाप कमी करावे लागले. परिणामी, भारताचा व्हेनेझुएलाशी व्यापार आता कमी आणि घटत चालला आहे, असे जीटीआरआयने रविवारी नोंदवले. अमेरिकन सैन्याने व्हेनेझुएलामध्ये मोठी लष्करी कारवाई केल्यानंतर, राष्ट्राध्यक्ष निकोलस



मादुरो आणि त्यांच्या पत्नीला ताब्यात घेऊन त्यांना कथित नार्को-दहशतवाद आणि अंमली पदार्थांच्या तस्करीसह आरोपांसाठी अमेरिकेत नेले.

२०२४-२५ मध्ये, भारताची व्हेनेझुएलामधून एकूण आयात फक्त ३६४.५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स होती, त्यापैकी कच्च्या तेलाचा वाटा २५५.३ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स होता, जो २०२३-२४ मध्ये १.४ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या कच्च्या तेलाच्या आयातीपेक्षा ८१.३ टक्के कमी आहे. जीटीआरआयच्या मते, भारताची व्हेनेझुएलाला होणारी निर्यात माफक होती, ती ९५.३ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स इतकी होती, ज्यामध्ये औषधांचा समावेश होता, ज्याचे मूल्य ४१.४ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स इतके होते. "कमी व्यापाराचे प्रमाण, विद्यमान निर्बंधांचे बंधने आणि मोठे भौगोलिक अंतर पाहता, व्हेनेझुएलातील सध्याच्या घडामोडींचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर किंवा ऊर्जा सुरक्षेवर कोणताही अर्थपूर्ण परिणाम होण्याची अपेक्षा नाही," असा जीटीआरआयने पुनरुच्चार केले. या उदयोन्मुख जागतिक व्यवस्थेत, येत्या काही वर्षांत कच्च्या मालासाठी आणि ऊर्जा संसाधनांसाठी युद्धे तीव्र होण्याची शक्यता आहे. म्हणून, भारताने सावधगिरीने वागावे, आपल्या धोरणात्मक स्वायत्ततेचे रक्षण करावे, सार्वभौमत्व किंवा दीर्घकालीन हितसंबंध कमकुवत करणारे करार टाळावेत आणि भू-राजकीय दबावाशिवाय महत्त्वपूर्ण कच्चा माल आणि ऊर्जा प्रवेश सुरक्षित करावा असे जीटीआरआयने सुचवले.

जीटीआरआयच्या मते, व्हेनेझुएलाच्या कच्च्या तेलावर नियंत्रण मिळवणे हे अमेरिकेच्या ऑपरेशनचे केंद्रबिंदू होते. व्हेनेझुएलाकडे जगातील सुमारे १८ टक्के तेल साठा आहे, जो सौदी अरेबिया (सुमारे १६ टक्के), रशिया (सुमारे ५-६ टक्के) किंवा अमेरिका (सुमारे ४ टक्के) पेक्षा जास्त आहे. एकट्या व्हेनेझुएलाकडे अमेरिका आणि रशियाच्या एकत्रित तेल साठ्यापेक्षा जास्त कच्च्या तेलाचे साठे आहेत.

## उमर खालिदच्या जामिनावर आज निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** दिल्ली दंगली घडवण्याचा कट रचल्याचा आरोप असलेल्या उमर खालिद, शरजील इमाम आणि इतरांच्या जामीन अर्जांवर सर्वोच्च न्यायालय ५ जानेवारी रोजी निकाल देणार आहे.

न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने दीर्घ युक्तिवाद ऐकल्यानंतर डिसेंबरमध्ये आपला निर्णय राखून ठेवला. या आरोपींवर बेकायदेशीर क्रियाकलाप (प्रतिबंध) कायदा सारख्या कठोर कायद्यांखाली आरोप ठेवण्यात आले आहेत. त्यांच्यावर २०२० च्या दिल्ली दंगलींचा सूत्रधार असल्याचा आरोप आहे, ज्यामध्ये ५३ लोकांचा मृत्यू झाला आणि ७०० हून अधिक लोक जखमी झाले. दिल्ली उच्च न्यायालयाने यापूर्वी या आरोपींना जामीन नाकारला होता.

या आरोपींनी दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. उमर खालिद, शरजील इमाम आणि इतरांच्या जामीन अर्जांवर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि एन.व्ही. अंजारिया यांचे खंडपीठ ५ जानेवारी रोजी निकाल देणार आहे. डिसेंबरमध्ये, सर्वोच्च न्यायालयाने पक्षकारांचे युक्तिवाद ऐकले. दिल्ली पोलिसांकडून सॉलिसिटर जनरल तुषार मेहता आणि अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस.व्ही. राजू यांनी हजेरी लावली. आरोपींकडून वरिष्ठ वकील कपिल सिब्बल, अभिषेक सिंघवी, सिद्धार्थ दवे, सलमान खुर्शीद आणि सिद्धार्थ लुथरा यांनी युक्तिवाद केला. बेकायदेशीर कारवाया (प्रतिबंध) कायदा हा दहशतवाद विरोधी कायदा आहे. उमर, शरजील आणि इतर आरोपींवर दहशतवाद विरोधी कायदा आणि भारतीय दंड संहितेच्या कलमांखाली आरोप ठेवण्यात आले आहेत. नागरिकत्व (सुधारणा) कायदा (सीएए) आणि राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी) विरोधात झालेल्या व्यापक निदर्शनांनंतर उसळलेल्या २०२० च्या दंगलीचा सूत्रधार असल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. न्यू यॉर्कचे महापौर जोहरान ममदानी यांनी उमर खालिद यांना एक पत्र लिहिले. या पत्रामुळे देशातील राजकीय वातावरण तापले. भाजपाने ममदानी यांच्यावर भारताच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप केल्याचा आरोप केला.

### खैबर पख्तूनख्वा येथे पोलिसांची हत्या

**पेशावर :** पाकिस्तानच्या वायव्येकडील खैबर पख्तूनख्वा प्रांतात अज्ञात बंदूकधाऱ्यांनी केलेल्या गोळीबाराच्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये किमान चार पोलिस कर्मचारी ठार झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. शनिवारी अशांत प्रांतातील लक्की मारवत आणि बन्नू जिल्ह्यात या घटना घडल्या. पोलिसांच्या प्रवक्त्याने दिलेल्या माहितीनुसार, सराय नौरंग शहरात अज्ञात मोटारसायकलस्वार दहशतवाद्यांनी गोळीबार केला, ज्यामध्ये कर्तव्यावर असलेल्या तीन वाहतूक पोलिसांचा मृत्यू झाला.

## सुरक्षा दलांच्या कारवाईत दहशतवादी ठिकाण उद्ध्वस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामुल्ला :** जम्मू आणि काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यात सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांच्या विरोधात मोठी कारवाई करत जंगल परिसरातील एक छुपे ठिकाण शोधून ते पूर्णपणे नष्ट केले आहे. ही कारवाई रविवारी करण्यात आली असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

बारामुल्ल्यातील शहरी भागाजवळील दाट जंगलात दहशतवादी लपून राहत असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी संयुक्त शोधमोहीम सुरू केली. या मोहिमेदरम्यान जंगलातील एका दुर्गम ठिकाणी दहशतवाद्यांनी उभारलेले छुपे ठिकाण आढळून आले. तत्काळ कारवाई करत सुरक्षा दलांनी हे ठिकाण उद्ध्वस्त केले. या छुप्या ठिकाणातून सुरक्षा दलांनी मोठ्या प्रमाणात साहित्य जप्त केले आहे. त्यामध्ये दोन हातबॉम्ब, ए.के.-४७ रायफलसाठी गोळ्या, वायरलेस संवादासाठी वापरण्यात येणारे साहित्य, वायर कटर, कुल्हाड तसेच इतर दैनंदिन वापराच्या वस्तूंचा समावेश आहे. हे साहित्य दहशतवादी हल्ल्यांसाठी तसेच जंगलात लपून राहण्यासाठी वापरले जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या कारवाईदरम्यान कोणतीही चकमक झाली नाही तसेच कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, या कारवाईमुळे उत्तर काश्मीरमधील दहशतवादी कारवायांना मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

### ३१ मार्चपर्यंत थकित कर्ज ४.१७ लाख कोटींवर पोहोचणार

# पंजाबमधील आपचे सरकार तीव्र आर्थिक संकटात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चंदीगड :** आर्थिक संकटात सापडलेले आपच्या नेतृत्वाखालील पंजाब सरकार २०२५-२६ आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत राज्य सिक्युरिटीजच्या विक्रीद्वारे खुल्या बाजारातून १२,००६ कोटी रुपये कर्ज घेण्याची शक्यता आहे. परिणामी, या वर्षी ३१ मार्चपर्यंत थकीत कर्ज ४.१७ लाख कोटी रुपयांवर पोहोचण्याचा अंदाज आहे, जो मागील आर्थिक वर्षात ३.८२ लाख कोटी रुपयांपेक्षा ९% जास्त आहे.

राज्य सरकार जानेवारीमध्ये ३,००० कोटी रुपये, फेब्रुवारीमध्ये ४,००० कोटी रुपये आणि मार्चमध्ये ५,००६ कोटी रुपये कर्ज घेणार



असल्याचे सूत्रांनी सांगितले. जानेवारी ते मार्च या कालावधीसाठी सरकारने रिझर्व्ह बँकेला ही कर्ज योजना आधीच सूचित केली आहे.

विधानसभा निवडणुकीला सुमारे एक वर्ष शिल्लक असताना, सर्व महिलांना मासिक १,१०० रुपये भत्ता देण्याचे आश्वासन पूर्ण करण्यासाठी सरकारवर दबाव वाढत आहे, त्याचबरोबर जुनी पेन्शन योजना लागू करणे आणि सरकारी कर्मचाऱ्यांना प्रलंबित महागाई भत्त्याचे हप्ते देणे देखील आवश्यक आहे.

चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजात राज्य सरकारने ३४,२०१ कोटी रुपयांचे निव्वळ कर्ज घेण्याचा अंदाज वर्तवला आहे आणि उर्वरित रक्कम पहिल्या तीन तिमाहीतच उभारण्यात आली आहे. या तिमाहीत राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी बाँड विक्रीद्वारे उभारलेल्या एकूण ४.९९ लाख कोटी रुपयांच्या सुमारे २.४% कर्ज आहे. कर्ज घेणे केंद्र सरकार आणि आरबीआयने मंजूर केलेल्या मर्यादेत असले तरी, पंजाब हे देशातील सर्वात कर्जबाजारी राज्यांपैकी एक आहे, ज्याचे कर्ज-ते-जीएसडीपी प्रमाण ४६% आहे.

राज्य सरकारच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, व्याजाचा भार कमी करण्यासाठी स्पर्धात्मक दराने कर्जे उभारली जात आहेत. त्यांनी सांगितले की, एकूण खर्च कमी करण्यासाठी सरकार मागील सरकारांनी घेतलेल्या जुन्या कर्जांवर जास्त व्याजदराने पुनर्विचार करत आहे.

सूत्रांनी असे निदर्शनास आणून दिले की आणखी एक मोठी चिंता म्हणजे कर्जफेडीचा एक महत्त्वाचा भाग कर्जफेडीसाठी, मुद्दल आणि व्याजाची परतफेड करण्यासाठी आणि इतर खर्च भागविण्यासाठी वापरला गेला आहे. येत्या आर्थिक वर्षात कर्जफेडीवर ४३,१९४ कोटी रुपये खर्च होतील असा अंदाज आहे, त्यापैकी २४,९९५ कोटी रुपये व्याजफेडीसाठी आणि १८,१९९ कोटी रुपये मुद्दलफेडीसाठी जातील. ही रक्कम वर्षाच्या अंदाजे निव्वळ कर्जापेक्षा जास्त असेल. मनोरंजक गोष्ट म्हणजे, चालू आर्थिक वर्षात, वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या ४३.५% आहे, ज्यामुळे तो सर्वात मोठा वाटादार बनला आहे.

विरोधकांनी सरकारवर राज्याला आर्थिक संकटात ढकलल्याचा आरोप केला आहे आणि पंजाब दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असल्याचा इशारा दिला आहे. सरकारने जुलैमध्ये २००० कोटी रुपये, ऑगस्टमध्ये ३००० कोटी रुपये आणि सप्टेंबरमध्ये ३,५०० कोटी रुपये कर्ज उभारले. एप्रिल आणि मे दरम्यान, एकूण ६,२४१.९२ कोटी रुपयांचे कर्ज सरकारने घेतले. सूत्रांनी सांगितले की, गेल्या वर्षी मार्चपर्यंत राज्याचे एकूण थकित कर्ज ३.८२ लाख कोटी रुपये होते, जे सकल राज्य देशांतर्गत उत्पादनाच्या (जीएसडीपी) ४४% पेक्षा जास्त आहे.

काही महिन्यांपूर्वी, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी संसदेत मांडलेल्या कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या राज्यांवरील अहवालात पंजाबच्या कर्जाच्या जीएसडीपी गुणोत्तरावर चिंता व्यक्त केली होती आणि म्हटले होते की ते देशात दुसऱ्या क्रमांकाचे सर्वोच्च आहे.